# महाराष्ट्र विधानसभा
## चौथे अधिवेशन, २०१४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०१४ / आग्रहनय १८, १९३६ ( शके )**

**(१) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(२) मुख्यमंत्री**
**(३) मदत, पुनर्वसन व भूकंप पुनर्वसन मंत्री**
**(४) गृहनिर्माण मंत्री**
**(५) कामगार मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना मंत्री**
**(७) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री**
**(८) अन्न आणि औषध प्रशासन मंत्री**
**(९) जलसंपदा मंत्री**
**(१०) परिवहन मंत्री**
**(११) पर्यावरण मंत्री**
**(१२) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री**
**(१३) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - ७९**

### आपत्ती व्यवस्थापक प्राधिकरणाची मागील चार वर्षात बॅठक झाली नसल्याबाबत

**(१) * १ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली तर त्याला सामोरे जावे यासाठी शासनाने आपत्ती व्यवस्थापक प्राधिकरण स्थापन केले होते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येईल या विषयीचे धोरण ठरविण्यासाठी गेल्या चार वर्षात एकदाही बैठक झाली नसल्याची बाब माहे ऑगस्ट, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत बैठक न घेण्यामागील कारणे काय आहेत,
(4) असल्यास, माहे जुलै, 2014 मध्ये पुणे येथील माळीण गावावर नैसर्गिक आपत्ती ओढवल्यावर शासनाने स्थापन केलेले आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कार्यान्वित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना शासन निर्णय दिनांक २४.०५.२००६ अन्वये करण्यात आलेली आहे. सदर प्राधिकरणाची दर वर्षी पावसाळ्यापूर्वी बैठक घेण्यात येते. त्यानुसार प्राधिकरणाची शेवटची बैठक दि.२९ मे, २०१४ रोजी घेण्यात आली होती.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) माळीण गांवावर नैसर्गिक आपत्ती ओढवल्यानंतर जिल्हा आपत्ती प्राधिकरणाने आवश्यक सर्व उपाययोजना केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेकडून होत असलेला दुषित पाणी पूरवठा**

**(२) * १६ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईत दुषित पाणीपुरवठा होत असल्याप्रकरणी मुंबई महानगरपालिकेकडे 867 तक्रारी प्राप्त झाल्याचे माहे जुलै, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन ह्या जुन्या झालेल्या आहेत, तसेच बहुतांश ठिकाणी पाण्याच्या पाईप लाईन या सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याच्या लगत आहेत, काही ठिकाणच्या पाईपला गळती लागलेली असल्याने नाल्यातील घाण पाणी पिण्याच्या पाण्यात मिसळत असल्याने पाणी दूषित होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, प्रश्न भाग-1 बाबत मुंबईत होत असलेल्या पाणीपुरवठ्याच्या तक्रारीनुसार शासनाने मुंबईतील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे दुषित पाणी पुरवठा होत असल्याच्या एकूण २६३ तक्रारी जुलै २०१४ मध्ये प्राप्त झाल्या आहेत.
(२) हे अशंतः खरे आहे. मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या काही जलवाहिन्या जुन्या झाल्या असल्या तरी त्या टप्प्याटप्प्याने बदलण्याचा कार्यक्रम चालू आहे. परंतु दुषित पाणी पुरवठा रोखण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक प्रतिबंधक उपाययोजना त्वरीत अमंलात आणण्यात येतात.
(३) जुन्या झालेल्या जलवाहिन्या कालबध्द कार्यक्रमातून बदलण्यात येत आहेत. मागील तीन वर्षामध्ये मुंबई शहरातील ४७१४२ मीटर लांबीच्या जुन्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत आणि २८६६० मीटर लांबीच्या जलवाहिन्यांचे पुनर्स्थापन करण्यात आले आहे. तसेच नाल्यलगत असलेल्या जलवाहिन्यांच्या स्थानांतरणाची २६१ कामे मागील तीन वर्षात करण्यात आली आहेत. तसेच जुलै २०१४ मध्ये जलजोडण्या / जलवाहिन्यांवरील एकूण २७९४ गळत्या दुरुस्त करण्यात आल्या.

सध्या मुंबई शहरात खंडीत पाणीपुरवठा करण्यात येत असल्यामुळे उर्वरीत वेळेत जलवाहिनीमध्ये दुषित पाण्याचा शिरकाव होण्याची शक्यता असते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी तसेच मुंबईच्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी, उपलब्ध जलस्त्रोतांचा पुरेपूर वापर करुन एकूण पाणीपुरवठा व्यवस्थेचा योग्य व एकात्मिक जल वितरण व्यवस्थापन कार्यक्रम राबवत आहे व त्यासाठी विना महसूल पाण्याचे प्रमाण कमी करणे, गळती नियंत्रण करणे, समान पाणी वाटप, दाबाचे समानीकरण, पाण्याची गुणवत्ता सुधारणे व पाणीपुरवठा वेळेत वाढ या प्रमुख बाबी

अध्यारुत आहेत. त्यासाठी सेवा उपलब्धीकाराची नियुक्ती माहे एप्रिल २०१४ मध्ये केली असून, एच/पश्चिम व टी विभाग या दोन विभागांत प्रायोगिक तत्वावर २४ तास पाणीपुरवठा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल या प्रयोगाच्या निष्कर्षावर उर्वरीत टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येईल. पाणी पुरवठ्याच्या वेळेच्या वाढीमुळे पाण्याच्या दुषितीकरणाचे प्रमाण कमी होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड व लातूर जिल्हयात निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई

**(३) * १२४८ श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.बालाजी किणीकर (अबंरनाथ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नांदेड व लातूर जिल्हयात भीषण पाणी टंचाईचे संकट निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर पाणी टंचाई दूर करण्यासाठी शासनाने वा जिल्हा प्रशासनाने कृती आराखडा तयार केला आहे काय,
(3) असल्यास, सदर कृती आराखडयाचे स्वरुप काय आहे व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(4)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** १. होय, हे खरे आहे.
२. होय,
३. ऑक्टोबर ते डिसेंबर २०१४ या कालावधीकरिता लातूर जिल्हयाकडून अदांजे रुपये १८१.८९ लक्ष व नांदेड जिल्हयाकडून अदांजे रुपये 461.99 लक्ष रकमेचे टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत.

लातूर जिल्हयात टंचाई कृती आराखड्यानुसार २७४ गावे, ८८ वाड्यांमध्ये ४४८ तातडीच्या उपाययोजना घेण्यात येणार आहेत. तसेच नांदेड जिल्हयात ३२७ गावे, १०४ वाड्या तसेच ७ नगर परिषद क्षेत्रात ७७७ तातडीच्या उपाययोजना घेण्यात येणार आहेत.

पिण्याच्या पाण्याची टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या उपाययोजनांसाठी सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात आतापर्यंत लातुर जिल्हयास रु.२१२.६८ लक्ष व नांदेड जिल्हयास रु.४०६.९१ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. तसेच ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत घेण्यात येणा-या उपाययोजनासाठी लातुर जिल्हयाची रु.५२४.३५ लक्ष व नांदेड जिल्हयाची रु.७३९.९० लक्ष इतक्या रकमेची मागणी महसूल व वन विभागास पाठविण्यात आलेली आहे.
४. प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील गांधीनगर म्हाडा वसाहतीमधील इमारत क्र. 51 चे बांधकाम अतिशय धोकादायक असल्याबाबत

**(४) * १७७४ श्री.प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) वांद्रे (पूर्व) येथील गांधीनगर म्हाडा वसाहतीमधील इमारत क्र. 51 चे बांधकाम अतिशय धोकादायक झाले असल्याने त्या बिल्डींगमध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या शाळेतील वर्ग रिकामे करावेत असे म्हाडाने पत्राद्वारे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला दिनांक. 26 मार्च, 2014 रोजी वा त्यासुमारास कळविले आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, म्हाडाच्या पत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेने शाळेचे वर्ग रिकामे केले आहेत काय,
(3) अद्याप वर्ग रिकामे केले नसल्यास धोकादायक इमारत पडून जीवितहानी होऊ नये यासाठी करावयाच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) वांद्रे (पूर्व), मुंबई येथील गांधीनगर म्हाडा वसाहतीमधील 50 वर्षापूर्वीच्या इमारत क्र.51 स्थळ पाहणीनुसार मोडकळीस स्थितीत दिसून आल्याने सदरील इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील बृहन्मुंबई महानगरपालिकेची शाळा रिकामी करण्याकरिता म्हाडाने दि.14/3/2014 रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, एच पूर्व विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांस कळविलेले आहे.
(2) म्हाडाचे सदरहू इमारती मधील भाडेतत्वावरील बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एम.एच.बी.तेलगू शाळेचे सर्व वर्ग रिकामे केले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या दि.20/05/2014 च्या पत्रान्वये म्हाडाला कळविले आहे.
(3) म्हाडाने सदरहू इमारती मधील शाळेचे सर्व वर्ग रिकामे करण्यात येऊन 29 विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था खेरवाडी येथील महानगरपालिकेच्या शालेय इमारतीत करण्यात आलेली आहे. तसेच म्हाडाचे सदर इमारतीचे संरचनात्मक परीक्षण (Structural Audit) करण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल अलिकडेच दि.16.10.2014 रोजी म्हाडास प्राप्त झाला असून त्याअनुषंगाने म्हाडा मार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नवी मुंबई विमानतळासाठी ज्या गावांची जमिन शासनाने संपादित केली आहे त्या गावांकरिता शासनाने पॅकेज जाहिर केल्याबाबत

**(५) * ७०६ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नवी मुंबई विमानतळासाठी ज्या गावांची जमिन शासनाने संपादित केली आहे त्या गावांकरिता शासनाने पॅकेज जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या पॅकेजमध्ये एका व्यक्तीने स्वतःच्या जमिनीत एकापेक्षा जास्त घरे बांधली असतील त्या घरमालकांना तीन पट जमिन न देणे, घरांच्या बांधकामासाठी 1000 रूपये चौ.फुट खर्च, तसेच दिलेल्या जमिनीचा एफएसआय 1.5 देण्यात आला आहे या बाबी या प्रकल्पग्रस्तांना मान्य नाहीत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या प्रकल्पगस्तांनी पुनर्वसित गावांना दिलेल्या जमिनीवर घरांच्या बांधकामासाठी सुमारे 2000 रुपये चौ.फुट खर्च, एफएसआय 1.5 ऐवजी 3 पर्यंत देण्यात यावा तसेच एका पेक्षा जास्त घरे बांधली आहेत अशांना तीन पट जमिन देणे अशा मागण्या आहेत, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, या मागण्यांबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) नवी मुंबई आतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामांसाठी तसेच नवी मुंबई प्रकल्पासाठी भविष्यात संपादित करण्यात येणा-या जमिनीच्या

भूधारकांसाठी भूसंपादनापोटी देय मोबदल्याबाबत आणि त्यानुषंगिक पुनर्वसन विषयक लाभांसंदर्भातील धोरणास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे.
(2) असे निदर्शनास आले नाही, आतापर्यत संबंधीत भागातील सुमारे 1900 बाधित भूधारकांनी / बांधकाम धारकांनी सदर धोरणाचे लाभ स्विकारण्यास स्वेच्छेने संमती दिलेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(3) हे खरे नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे महानगरपालिकेच्या फुरसुंगी येथील कचरा डेपोमुळे फुरसुंगी परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोत प्रदुषित झाल्याबाबत**

**(६) * ७२९ :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) पुणे महानगरपालिकेच्या फुरसुंगी येथील कचरा डेपोमुळे फुरसुंगी परिसरातील नैसर्गिक जलस्त्रोत प्रदुषित झाले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, येथील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत 93 कोटीची पाणीपुरवठा योजना मंजूर असून सदर योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** १) होय.
२) अशंत: खरे आहे,
राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत फुरसुंगी व उरळीदेवाची निमशहरी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रु ७८.०४ कोटी इतक्या रकमेच्या अदांजपत्रकास दि.०६ मे, २०१४ च्या शासन निर्णयान्वये काही अटीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
३) प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील अटीची पुर्तता करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुरु आहे. जलसंपदा विभागाकडून हेडवर्क्ससाठी व जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून जलशुध्दीकरण केंद्र आणि बैठ्या टाक्यांसाठी जागा उपलब्ध करुन घेणे, उर्ध्वनलिका कालव्याच्या कडेने टाकण्यासाठी नरवानगी घेणे तसेच पुणे महानगरपालिकेकडून त्यांचा हिस्सा रु २५.८२ कोटी यापैकी रु ९.२१ कोटी इतका निधी प्राप्त असून उर्वरित निधीसाठी पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे, अटीची पुर्तता न झाल्यामुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित आहे.

-----------------

**साखरी (ता.मोखाडा, जि.ठाणे) या ग्रुप ग्रामपंचायतीमार्फत बांधण्यात येणा-या शौचालयाच्या कामातील गैरव्यवहार**

**(७) * २८६ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) साखरी (ता.मोखाडा, जि.ठाणे) या ग्रुप ग्रामपंचायतीमधील निर्मल भारत अभियान आणि म.ग्रा.रा.रो.ह योजनेअतंर्गत बांधण्यात येणाऱ्या शौचालयाचे काम अपूर्ण असताना

पूर्ण झाल्याचे दाखवून गैरव्यवहार केल्याचे माहे जुलै, 2014 च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गैरव्यवहार करणा-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** १. हे खरे नाही.
गट विकास अधिकारी पंचायत समिती, मोखाडा यांनी चौकशी केली असता सदर बाब निदर्शनास अलेली नाही.
२. प्रश्न उद् भवत नाही.
३. प्रश्न उद् भवत नाही.
४. प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**माळीण (ता.आबेगांव, जि.पुणे) गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(८) * १८५० श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) माळीण (ता.आबेगांव, जि.पुणे) येथे दिनांक 30 जुलै, 2014 रोजी डोंगराच्या कडा कोसळल्यामुळे झालेल्या दुर्घटनेत एकूण 151 जण गाडले गेले असून सदरहू मृतदेहांपैकी 146 जणांचे मृतदेह सापडले असून आजमितीस 5 मृतदेह सापडलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(2) सदरहू दुर्घटना घडल्यानंतर आजमितीस सुमारे 3 महिन्यांचा कालावधी लोटलेला असतानाही या गावाचे अद्यापही पुनर्वसन करण्यात आलेले नाही व या दुर्घटनेत जे नागरीक बचावले आहेत त्यांना अद्यापही हक्काचा निवारा आणि जागा मिळण्यासाठी नागरिकांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, माळीण गावाचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना लवकरात लवकर शासनाकडून मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशंत: खरे आहे.
सदर दुर्घटनेत १४६ मृतदेह व ५ मृतदेहाचे अवयव सापडले आहेत.
(२) व (३)
अ) सदर दुर्घटनेनंतर बाधितांसाठी ताप्तुरत्या निवाऱ्यांची सोय करण्यात आली आहे.
ब) दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना नैसर्गिक आपत्ती अतंर्गत मुख्यमंत्री सहायता निधीतून, पंतप्रधान सहायता निधीतून, राष्ट्रीय कुटूंब सहायता निधीतून व आम आदमी योजनेअतंर्गत अनुदान वाटप करण्यात आले आहे.
क) बाधित व्यक्तिंना कपडे, घरगुती भांडी खरेदीकरीता तसेच मृतजनावरांच्या मालकांना व जखमी व्यक्तीना अनुदान वाटप करण्यात आले आहे.
ड) शेतकरी अपघात विमा योजनाअतंर्गत राजीव गांधी शालेय विद्यार्थी अपघात विमा योजने अतंर्गत अनुदान वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धानोरा येरकड (जि.गडचिरोली) गावाजवळ**
**नक्षलवाद्यांनी भुसुरुंग स्फोट घडवून आणल्याबाबत**

**(९) * ११८२ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) धानोरा येरकड (जि.गडचिरोली) गावाजवळ नक्षलवाद्यांनी भुसुरुंग स्फोट घडवून जिल्हा पोलीस दलाचे दोन व केंद्रीय राखीव पोलीस दलाचे 2 जवान जखमी झाल्याची घटना दिनांक 16 सप्टेंबर, 2014 रोजी वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, नक्षलवाद्यांची कारवाई रोखण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. परंतु सदर घटना दिनांक १५ सप्टेंबर, २०१४ रोजी घडली असून भुसुरुंग स्फोटामध्ये भारत राखीव बटालियनचा एक जवान शाहिद झाला असून जिल्हा पोलीस दलाचे दोन व भारत राखीव बटालियनचे दोन असे चार जवान जखमी झाले आहेत.
(२) नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया व हल्ले रोखण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत:-
(१) शासनाने नक्षलवाद्यांच्या मुकाबला करण्यासाठी आवश्यक ती शस्त्रे व दारुगोळा याबरोबर आधुनिक संपर्क व्यवस्था, वाहन व्यवस्था, भुसूरुंग प्रतिबंधक वाहने व हेलिकॉप्टर उपलब्ध करुन दिले आहेत.(२) जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या कारवायांवर अकुंश लावण्यासाठी जिल्हा पोलीस तसेच केंदिय राखीव पोलीस बल यांच्या माध्यमातून नक्षलविरोधी अभियान राबविण्यात येते. तसेच एरिया डॉमिनेशन कार्यवाही करुन नागरीकांना सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे. (३) जिल्ह्यात नक्षलविरोधी कृतीकरीता केंद्रीय राखीव पोलीस बलाच्या बटालियन, कोब्रा बटालियन, राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या व जिल्हा पोलीस दल तसेच सी-६० च्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. जवानांना युध्दप्रशिक्षण देण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. नक्षलविरोधी शोध अभियान, गस्त, नाईट ॲम्बुश, नाकाबंदी यामुळे नक्षलवाद्यांच्या हालचालीवर प्रतिबंध आणण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात झालेल्या अतिवृष्टीत मृत झालेल्या**
**व्यक्तीच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत**

**(१०) * ३३० डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चरण वाघमारे**

**(तुमसर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात माहे जुलै-ऑगस्ट,2014 मध्ये झालेल्या अतिवृष्टीत सुमारे 200 जणांचा मृत्यू झाल्याचे , धुळे तालुक्यात संततधार पावसामुळे 347 गुरे ठार तर घराची भिंत पडून एकाचा मृत्यु झाल्याचे तसेच विदर्भात माहे ऑगस्ट-सप्टेंबर,2014 मध्ये झालेल्या अतिवृष्टीने वीज कोसळून 10 जणांचा मृत्यू तर 21 जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर घटनेत मृत झालेल्या मृतांच्या कुटूंबियांना व गुरांच्या मालकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात माहे जुलै-ऑगस्ट, २०१४ या कालावधीत अतिवृष्टीमुळे ३४७ जणांचा मृत्यू झाला असून, विदर्भात माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१४ मध्ये ९८ जणांचा मृत्यू झाला असून, ९४ व्यक्ती जखमी झाले आहेत. तसेच धुळे तालुक्यात भिंत कोसळून एक व्यक्ती व वीज पडून एक व्यक्तीचा मृत्यू झाला असून २१४ जनावरे मयत झाली आहेत.

(२) पात्र मृत व्यक्तीच्या वारसांना व जखमीना अनुज्ञय मदत देण्यात आली असून, उर्वरित पात्र मृत व्यक्तीच्या वारसांना व जखमीना मदत देण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाच्या सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यभर काम करणा-या 1600 कर्मचा-यांना मागिल ४ महिन्यापासून मासिक वेतन मिळालेले नसल्याबाबत**

**(११) * १३५८ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाच्या सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यभर काम करणा-या 1600 कर्मचा-यांना माहे जुलै ,2014 पासून अद्यापही मासिक वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू कर्मचा-यांना मासिक वेतन न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(3) सदरहू कर्मचा-यांना मागील 4 महिन्यांपासून रखडलेले वेतन मागील थकबाकीसह विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) काही जिल्ह्यामध्ये तसेच काही मनपा मध्ये सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन जूलै, २०१४ पासून अदा झालेले नाही हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ पासून सर्व केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी राज्य शासनामार्फत वितरीत करण्यात येत आहे. सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत करण्यात आलेला आहे. नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने नवीन लेखाशिर्ष उघडणे, कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता घेणे याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याने अनुदान वितरीत करण्यात विलंब झालेला आहे.

(३) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान निधीतून रु.१११० लाख तसेच महानगरपालिका निधीतून रु.६५० लाख अग्रीम घेण्यात आले आहे. या अग्रीमातून कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येत आहे.

-----------------

**राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, (कांदिवली) बंद अपूरा कर्मचारीवर्ग व डॉक्टरांच्या रिक्त पदांमुळे बंद असल्याबाबत**

**(१२) * १५९३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) कांदिवली (पुर्व) आकुर्ली रोड येथे ई.एस.आय.एस ( ESIS) हे राज्य शासकीय कामगारांसाठी बांधण्यात आलेले रुग्णालय अपु-या डॉक्टर, नर्सेस, कामगारांमुळे सदर रुग्णालय बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संबंधित विभागाने रुग्णालयाची पाहणी केली आहे काय, असल्यास, सदर रुग्णालय त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही. राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, कांदिवली येथील रुग्णालयाच्या सध्याच्या जागेवर नवीन इमारतीचे काम सुरु आहे. त्यामुळे हे रुग्णालय बंद नसून ते कांदिवली येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील काही भाग भाड्याने घेऊन तेथे सुरु ठेवण्यात आले आहे. येथे पुरेशा संख्येने डॉक्टर, नर्सेस, कामगार कार्यरत आहेत.

(२) कांदिवली रुग्णालयाची बांधकाम सुरु असलेली इमारत केंद्र शासनाच्या कामगार राज्य विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या ताब्यात आहे. सदर इमारतीला इमारत पूर्णत्वाचा दाखला बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अद्याप मिळालेला नाही. सदर दाखला मिळाल्यावर रुग्णालय पूर्वीच्या जागेवर सुरु करण्यात येईल.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्हा सामान्य रूग्णालयात गत आठ महिन्यात १८ गर्भवती महिलांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१३) * २३०१ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) जळगाव जिल्हा सामान्य रूग्णालयात गेल्या आठ महिन्यात 18 गर्भवती महिलांचा आणि माहे नोव्हेंबर, 2014 च्या पहिल्या पंधरवड्यात तीन गर्भवती महिलांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. जळगांव जिल्हा सामान्य रुग्णालय येथे दिनांक १/०४/२०१४ ते १५/११/२०१४ या कालावधित १८ गर्भवती माहिलांचा (मातामृत्यु) मृत्यू झालेला आहे हे खरे आहे.
(२) व (३) गर्भधारणेपासून बालकाच्या जन्मानंतरचे ४२ दिवस या कालावधीत मातेचा मृत्यू झाल्यास त्याचा आढावा मातामृत्यू माता मृत्यू अन्वेषण गुणवत्ता अभिवचन समिती कडून घेण्यात येतो. सदर १८ माता मृत्यू प्रकरणी जिल्हा माता मृत्यू अन्वेषण गुणवत्ता अभिवचन समितीने आढावा घेतला असून आढाव्यानुसार मातेस उद्भवलेल्या वैद्यकीय गुंतागुंतीमुळे तसेच इतर वैद्यकीय कारणाने मातेचा मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे, यामुळे कोणावरही कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वसई (जि.पालघर) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना रेशन मिळत नसल्याबाबत

**(१४) * २२४ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) वसई (जि. पालघर) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना रेशन मिळत नसल्याच्या निषेधार्थ दिनांक 4 ऑक्टोबर, 2014 रोजी वसई तालुका कार्यालयावर श्रमजीवी संघटनेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सत्याग्रह आदोलन केले , हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) दि.29 सप्टेंबर, 2014 रोजी श्रमजीवी संघटनेचे प्रतिनिधी व रेशनकार्डधारक यांनी याबाबत तहसीलदार वसई (जि.पालघर) येथे धान्य मिळत नसल्याची तक्रार दिलेली आहे.
(2) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये तथ्य आढळून आलेला नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील शासकीय वसतीगृहातील विदर्याथ्याना संगणक व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षणासाठी मंजूर निधीपैकी रु. 24 कोटीचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(१५) * १५२५ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) शासकीय वसतीगृहातील विदर्याथ्याना संगणक व व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षणासाठी मंजूर निधीपैकी रु. 24 कोटीचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी तीन खाजगी कंपन्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केल्याची बाब माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## निमगाव खलु व मौजे लिपणगाव (ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर) येथे दरोडेखोरांनी महिलांना ठार केल्याबाबत

**(१६) * ४८४ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) निमगाव खलु (ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर) येथे दिनांक 10 ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्यादरम्यान दरोडेखोरांनी दरोडा घालून महिलेस ठार केले, हे ही खरे आहे काय,
(2) तसेच श्रीगोंदा तालुक्यातील मौजे लिपणगाव येथे दिनांक 9 ऑगस्ट, 2014 रोजी झालेल्या दरोड्यातही महिलेचा निघृण खून करण्यात आला हे खरे आहे काय,
(3) असल्यास, श्रीगोंदा तालुक्यातील मागील 2 ते 3 वर्षात हिरडगाव, आढळगाव, टाकळी, लोणार, पिंपळगाव पिसा, कोथुळ, वडाळी, काष्टी, धारगाव, येळपणे, निमगाव खलु, लिंपणगाव या गावांमध्ये 13 दरोडे पडून 14 नागरिकांना दरोडेखोरांनी ठार केले आहे, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, उपरोक्त एकाही गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यात पोलीस प्रशासनाला यश आले नाही, हे खरे आहे काय,
(5) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## राज्यातील सुशिक्षित बेराजगारांना आधार देणा-या जिल्हा उद्योग केंद्रामार्फत अपेक्षित उद्दीष्ट पूर्ण होत नसल्याबाबत

**(१७) * १२३५ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सुशिक्षित बेराजगारांना आधार देणा-या जिल्हा उद्योग केंद्रामार्फत अपेक्षित उद्दीष्ट पूर्ण होत नसल्याचे निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र योजना, व शेतक-यांसाठी बीज भांडवल योजनेंअतंर्गत उद्योग व्यवसायासाठी कर्ज देण्यासाठी जाचक कागदपत्रांची पूर्तता व बँकाच्या उदासिनपणामुळे जिल्हा उद्योग केंद्राकडे सुशिक्षीत बेरोजगारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती निर्दशनास आली आहे. हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून सदरील योजनांचा लाभ घेण्याकरीता सुशिक्षित बेरोजगारांचे उद्दीष्टे वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

राज्यात जिल्हा उद्योग केंद्रामार्फत बेरोजगारांकरीता पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व सुधारित बीज भांडवल योजना राबविण्यात येत असून या योजनांअतंर्गत शासनाने निश्चित केलेले उद्दिष्टापेक्षा जास्त प्रमाणात पूर्ण झालेले आहे.
(२) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व सुधारित बीज भांडवल योजना या योजनांचा लाभ मिळण्याकरीता मार्गदर्शकतत्वानुसार आवश्यक/परिपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर पात्र लाभार्थींची प्रकरणे बॅकांमार्फत मंजूर केली जातात. सदर योजनांआतर्गत शेतकऱ्यांसाठी बीज भांडवल योजना राबविली जात नाही. सुशिक्षित बेरोजगारांसाठी उद्योग व्यवसायाकरिता (सेवा उद्योग/उत्पादन उद्योग) कर्ज/अनुदान देण्याची तरतूद आहे.
(३) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजन व सुधारित बीज भांडवल योजना या योजनांसाठी दरवर्षी १० ते १५% उद्दिष्टांत वाढ करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ओडिशातील कोळसा खाणीचे वाटप रद्द करण्यात आल्याने राज्यात वीजनिर्मितीचे संकट असल्याबाबत**

**(१८) * ६५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
1) ओडिशातील कोळसा खाणीचे वाटप रद्द करण्यात आल्याने राज्यात वीजनिर्मितीवर मोठया प्रमाणात संकट कोसळले असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
2) असल्यास, वीजनिर्मितीचे संकट टाळण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** १) ओडिशातील कोळसा खाणीचे वाटप रद्द करण्यात आल्याने वीज निर्मितीवर संकट कोसळले, हे खरे नाही.
२) प्रश्न उद् भवत नाही.
३) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**नागपूर दक्षिण येथे नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारित असलेल्या बगीच्यांची होत असलेली दुर्दशा**

**(१९) * १३७४ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नागपूर दक्षिण मतदार संघातील नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारित असलेल्या बगीच्यांची अतिशय दुर्दशा झाल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे दिनांक 08 नोव्हेंबर, 2014 रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या बगीच्यातील लहानमुलांच्या खेळण्याची दुरावस्था व्यवस्थीत करण्यासाठी स्थानिक नगरसेवकांनी वारंवार नागपूर सुधार प्रन्यासला निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, स्थानिक नगरसेवकांच्या निवेदनावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे अशंत: खरे आहे. दि. 13 जून, 2013 ला नागपूर सुधार प्रन्यासने तयार केलेल्या बगीच्यामधील काही खेळणी नादुरुस्त झाल्याचे निदर्शनास आले.
(2) होय.
(3) व (4) सदर प्रकरणी नागपूर सुधार प्रन्यासने तयार केलेल्या बगीच्यांचे निरीक्षण करण्यात आले व दक्षिण नागपूरातील एकूण 8 उदयानातील खेळणी दुरुस्त करण्यात आली.

-----------------

## नागपूर शहरातील वार्ड क्र. 77 (जुने वार्ड क्र.) ख. नं. 441, येथील रामजीची वाडी, नवी शुक्रवारी या आरक्षित जागेचा व्यवसायीक वापर केल्याबाबत

**(२०) * १०११ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नागपूर शहरातील वार्ड क्र. 77 (जुने वार्ड क्र.) ख. नं. 441, मौजा नागपूर येथील रामजीची वाडी, नवी शुक्रवारी, जागा नागपूर सुधार प्रन्यासने लोकउपयोगासाठी आरक्षित केली असतांना सदरहू जमीनीची खोटे दस्तऐवज तयार करुन सदर जमीनीचा वापर व्यवसायीक वापरासाठी करण्यात आला असल्याचे माहे ऑगस्ट, 2014 च्या तिस-या आठवडयात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(4) नसल्यास, होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) नागपूर शहरातील रामजीची वाडी येथील खसरा क्र. 441 मधील `क्षत्राच्या, नागपूर सुधार प्रन्यासने दि. 28 जुलै, 1965 रोजी मंजूर केलेल्या सुधारित अभिन्यासात भूखंड क्र. 9 (भाग) व 10 ही जागा "खुली जागा" म्हणून दर्शविली होती. तथापि अर्जदाराने सादर केलेल्या अभिन्यासासंबंधी जुन्या कागदपत्रांच्या आधारे सदर भूखंड क्र. 9 (भाग) व 10 च्या एकत्रिकरणास नागपूर महानगरपालिकेकडून दि. 26 ऑगस्ट, 2005 रोजी मंजूरी देऊन दि. 14 फेब्रुवारी, 2006 रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली होती. परंतु सुधारित अभिन्यासात सदर जागा खुल्या जागेपैकी असल्याचे निदर्शनास आल्याने नागपूर महानगरपालिकेने दि. 17 मार्च, 2008 रोजी सदर बांधकाम परवानगी रद्द केली . यानंतर अर्जदाराने सादर केलेला बांधकाम नकाशा दि. 15 मे, 2014 रोजी नामंजूर करण्यात आला. सद्य:स्थिती या जागेवर हनुमान मंदिर स्थित असून उर्वरित जागा खुली आहे.
(2) नागपूर महानगरपालिकेने प्रश्नाधिन प्रकरणी बांधकाम परवानगी रद्द केलेली असल्याने शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, विषयांकित जागेवर बांधकाम परवानगी प्राप्त करुन घेताना / बांधकाम परवानगी अपेक्षिताना, संबंधितांनी नागपूर महानगरपालिकेस सादर केलेल्या कागदपत्रांची सखोल तपासणी करुन, गैरहेतूने, खोटी किंवा अमंलात नसलेली कागदपत्रे सादर करुन परवानगी प्राप्त करणेचा प्रयत्न केल्याचे आढळल्यास त्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करणेच्या दृष्टीने कायदेशिर बाबी पडताळून पुढील कार्यवाही करावी. व त्यासंदर्भात नागपूर महानगरपालिकेने संबंधितांवर

केलेल्या / करावयाच्या कारवाईबाबतचा अहवाल शासनास सत्वर सादर करावा, असे आयुक्त नागपूर महानगरपालिका यांना सूचित करण्यात आले आहे.
(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खडकदेवळा (ता.पाचोरा, जि.जळगांव) येथे भारत नव निर्माण सेवा योजनेच्या नावाखाली नोकरीची बनावट नियुक्ती पत्रे देवून बेरोजगारांची नोएडा येथील कंपनीने केलेली फसवणूक**

**(२१) * २१९९ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) खडकदेवळा ( ता.पाचोरा, जि.जळगांव ) येथे भारत नव निर्माण सेवा योजनेच्या नावाखाली केंद्र शासनाच्या नावाने वेगवेगळ्या कॉल सेंटरमध्ये नोकरीची बनावट नियुक्ती पत्रे देवून बेरोजगारांकडून प्रत्येकी रुपये 13 हजार प्रमाणे रक्कम घेऊन नोएडा येथील कंपनीने फसवणूक केली असल्याचे दिनांक 14 सप्टेंबर, 2014 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर बेरोजगारांना गंडा घालणारी कंपनी व संचालक/ कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**पहूर (ता.लोणार जि. बुलढाणा) येथील रेशन दुकानदार मुंढे यांनी शासकीय गोदामातून उचलेला धान्य परजिल्ह्यात विक्री केल्याबाबत**

**(२२) * १४३२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पहूर (ता.लोणार जि. बुलढाणा) येथील रेशन दुकानदार मुंढे यांनी शासकीय गोदामातून उचलेले 46 क्विंटल स्वस्त धान्य परजिल्ह्यात विक्री केल्याचे दिनांक 13 नोव्हेंबर, 2014 रोजीवा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या संदर्भात चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व संबधित दुकानदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) पहूर (ता.लोणार, जि.बुलडाणा) येथील रास्तभाव दुकानदार श्री.आर.एस.मुंढे यांनी शासकीय गोदामातून दिनांक 11 नोव्हेंबर, 2014 रोजी गहू 25 क्विंटल, तांदुळ 19 क्विंटल व साखर 2 क्विंटल धान्याची उचल केली. मात्र दिनांक 12 नोव्हेंबर, 2014 रोजी दुकानाच्या तपासणीत सदर धान्य आढळून आले नाही तसेच ते गावात न आणल्याचे व वितरण न केल्याचे आढळून आले.
(2) व (3) दिनांक 12 नोव्हेंबर, 2014 रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांनी प्रत्यक्ष भेट देवून तपासणी केली व सविस्तर चौकशी तहसिलदार लोणार यांच्या मार्फत

करण्यात आली. चौकशीत रास्तभाव दुकानदार श्री.मुंढे दोषी आढळून आले. त्यामुळे दुकान सील करुन त्यांच्यावर जीवनावश्यक वस्तु, कायदा 1955 कलम 3 व 7(2) अन्वये दिनांक 16 नोव्हेंबर, 2014 रोजी पोलीस स्टेशन, लोणार येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डेहणी (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) उपसा सिंचन योजनेचे काम अद्याप सुरू न झाल्याबाबत**

**(२३) * १७९० प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) डेहणी (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) उपसा सिंचन योजना सुरू करण्यासाठी कंत्राटदारांना शासनाने 300 करोड रूपये अग्रीम देयके देवून सुद्धा अद्यापी सदर उपसा सिंचन योजनेचे काम सुरू झाले नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर शासनाच्या निधीचा दुरूपयोग करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय, सदर कामांमध्ये अग्रीम देयके देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे काय,
(3) नसल्यास, सदर उपसा सिंचन योजनेचे काम मुदतीपुर्वी करण्याबाबत शासनाने संबंधित अधिका-यांवर व शासकीय कंत्राटदाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात आली आहे काय,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
सदर योजनेची किंमत ४११.८० कोटी असून योजनेवर ३४९.०१ कोटी खर्च झाला आहे. कंत्राटदारांना कोणतेही अग्रीम देयक देण्यात आलेली नाहीत. सद्य:स्थितीत योजनेच्या वितरण प्रणालीचे काम प्रगतीपथावर आहे.
(2) हे खरे नाही.
सदर कामामध्ये करारनामा अटी व शर्तीनुसार अग्रीम देयके देण्याची तरतुद नाही.
(३) योजनेच्या बांधकामसाठी विविध विभागांची मंजुरी, शेतकऱ्यांचा विरोध यामुळे विहित मुदतीत काम पूर्ण करण्यास येणाऱ्या अडचणीमुळे मुदतवाढ देणे अपरिहार्य ठरते. त्यामुळे अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.4 आ. बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) चे कार्यकारी अभियंता यांनी गैरव्यवहार केल्याबाबत.**

**(२४) * १३७ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) बाळापूर (ता.कळमनुरी,जि. हिंगोली) उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग क्र.4 चे कार्यकारी अभियंता श्री.शेख यांनी नियमबाह्य कामे करुन कोट्यवधीचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे सप्टेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी हिंगोली पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदकुमार तोष्णीवार यांनी तत्कालीन राज्यमंत्री जलसंपदा यांच्याकडे दिनांक 3 सप्टेंबर, 2014 रोजी प्रस्ताव सादर केला असून सदरहू प्रस्ताव मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी सचिव, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयास 5 सप्टेंबर, 2014 रोजी पाठविलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) हे खरे नाही./तथापी चौकशी सुरु आहे.
(2) होय.
(3) या निवेदनाच्या अनुषंगाने महामंडळास्तरावर चौकशी करण्यात येत आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जोगेश्वरी (पूर्व) येथील शंकरवाडीमधील आरक्षित भुखंडावर विकासकाने गलिच्छ वस्ती सुधारणा योजना लागू करुन टॉवर उभे केल्याबाबत**

**(२५)** * **५५३** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) जोगेश्वरी (पूर्व) येथील शंकरवाडीमधील बैरामजी जिजिभाय यांच्या मालकीचा 2.5 एकर क्षेत्रफळाचा करोडो रुपये किंमतीचा भूखंड मुंबई महानगरपालिकेकडे सन 1980 मध्ये हस्तांतरित केला असून सदर भूखंड खेळाच्या मैदानाकरिता आरक्षित असतांना विकासकाने गलिच्छ वस्ती सुधारणा योजना (स्लम योजना) लागू करुन टॉवर उभे केल्याचे नुकतेच माहे मार्च - एप्रिल, 2014 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे ?
(2) असल्यास, मा. उच्च न्यायालयाने ज्या जागा खेळाचे मैदान, रोड फुटपाथ यासाठी आरक्षित अशा जागेवर बांधकाम करतांना न्यायालयाची कोणतीही परवानगी घेतल्याखेरीज नवीन योजना मंजूर करु नये असे न्यायालयीन आदेश असतांनाही विकासकांने न्यायालयाची कोणतीही परवानगी न घेता सुधारित आशयपत्र सन 2011 मध्ये देऊन बांधकामास सुरुवात करुन टॉवर उभे केले आहेत, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उपरोक्त भुखंडावर खेळाचे मैदान, रोड फुटपाथ यासाठी आरक्षण असतांना तसेच न्यायालयाची स्थगिती असतांना टॉवर उभारुन शासनाची तसेच न्यायालयाची दिशाभूल करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी सातत्याने संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार करुनही दोषी विकासकांवर कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(6) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1)जोगेश्वरी (पूर्व) येथील न.भू.क्र. 330 हा 10793 चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेने खेळाच्या मैदानाकरीता संपादित केला होता. या भूखंडावर झोपडपट्टी असल्याने त्यावर बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, 1991 च्या कलम 33(10) अन्वये दि.28/5/1997 रोजी झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर करताना उक्त नियमावलीच्या परिशिष्ट-4 कलम 7.1 व 7.4 च्या तरतूदीनुसार किमान 33% भूखंड त्या प्रयोजनार्थ मोकळा ठेवण्याची अट घातलेली आहे.
(2) व (3) मा.मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.1152/2002 मध्ये दि.31/7/2002 रोजी असे अतंरीम आदेश होते की, क्रीडांगण, करमणूकीचे मैदउान

इत्यादीसाठी आरक्षित भूखंडावर उच्च न्यायालयाच्या मंजूरीशिवाय योजनांना मंजूरी देण्यात येवू नये. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशापूर्वी दि. 28/5/1997 रोजी मंजूरी दिलेली असल्याने या योजनेस न्यायालयाचे अतंरिम आदेश लागू होत नाहीत, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाचा अहवाल आहे. असे असले तरी सदर भूंखडावर खेळाच्या मैदानाच्या आरक्षणास अनुसरुन विकास नियंत्रण नियमावली नियम क्र. 33(10) परिशिष्ट - 4 पोटनियम 7.7 अन्वये 4356.69 चौ.मी.`क्षत्रफळाचे खेळाच्या मैदानाचे पुन:स्थाननिश्च (Relovation) करुन ते विकसित करुन महानगरपालिकेस हस्तांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच विकास नियोजन रस्त्याचे आरक्षण असून त्याकरिता 494.50 चौ.मी एवडा सेट बॅंक ठेवण्यात आलेला आहे.

(4), व (5) या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. 6/5/2014 रोजी दिलेल्या तक्रारीस अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन व प्राधिकरण यांच्या दालनात दि. 27/5/2014 रोजी बैठक आयोजित करुन योजनेबाबतची माहिती सन्मानीय लोकप्रतिनिधीनी अवगत करण्यात आली आहे.

(6) मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन 1152/2002 (सिटी स्पेस व इतर विरुध्द महा. शासन) मध्ये दि. 25/7/2014 व दि. 4/9/2014 च्या आदेशान्वये खेळाचे मैदान इत्यादी खुल्या आरक्षणासंदर्भात मान्यता किंवा त्याचे पुन:स्थाननिश्चयन करणे याबाबत याचिकाकर्त्याची हरकत नसल्यास झोपटपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम 11(4) अन्वये परवानगी देण्याची मुभा दिली आहे.

तसेच खेळाच्या मैदानासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादित केलेल्या सदरहू भूखंडावर झापेडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असल्योन सदर भूखंडाचे मूळ मालक श्री बेहरामजी जिजिभाई यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेविरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.1536/2012 दाखल केली असून मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.30/4/2013रोजी या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बांधलेल्या 5 इमारतीव्यक्तिीक्त इतर कोणत्याही इमारतीचे बांधकाम न्यायालयाच्या परवानगीशिवाय करता येणार नाही, असे आदेशित केले आहे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

### पुणे शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाणी नदीत सोडणाऱ्या सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पांचा वेग मंदावल्याबाबत

**(२६) * ११५६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाणी नदीत सोडणाऱ्या सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पांचा वेग मंदावल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पुण्यात रोज निर्माण होणाऱ्या 744 दशलक्ष लीटर सांडपाण्यापैकी 567 दशलक्ष लीटर सांडपाण्यावरच जलशुध्दीकरणाची प्रक्रिया केली जाते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संपूर्ण 744 दशलक्ष लीटर पाण्याचे शुध्दीकरण करण्याबाबत आदेश महानगरपालिकेला दिले आहे काय,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) व (2) पुणे शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाणी नदीत सोडणा-या सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पांचा वेग नदीत मंदावल्याचे निदर्शनास आले

नाही. सद्य:स्थितीत पुण्यात रोज निर्माण होणा-या 744 दशलक्ष लीटर सांडपाण्यापैकी 567 दशलक्ष लीटर सांडपाण्यावर जलशुध्दीकरणाची प्रक्रिया केली जाते.
(3) व (4) मुळा मुठा नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी पुणे महानगरपालिकेने राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाच्या मार्गदर्शक तत्वावानुसार, पुणे शहरातील संपूर्ण मैलापाण्यावर प्रक्रिया करुन ते नदीत सोडण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांच्याकडून तयार करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेच्या मान्यतेवर पर्यावरण विभागास सादर करण्यात आला.

तद्नंतर पर्यावरण विभागाने सदर प्रस्ताव त्या विभागाच्या शिफारशीसह केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागास मान्यतेसाठी सादर केला आहे.

-----------------

## अधेंरी (मुंबई) येथील लिंक रोडवरील 22 मजली लोटस बिझनेस इमारतीला लागलेल्या आगीबाबत

**(२७) * १८०४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) अधेंरी (मुंबई) येथील लिंक रोडवरील 22 मजली लोटस बिझनेस इमारतीला लागलेल्या आगीत अग्निशमन दलाचे 33 जवान अडकले असल्याचे व सहा तास सुरु असलेल्या या अग्नितांडवामध्ये एका जवानाचा मृत्यू झाल्याचे माहे ऑगस्ट, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त कारणास्तव अग्निशमन दलातील कमतरता निदर्शनास आली असून या अत्याधुनिक अत्यावश्यक सोयी सुविधा उपल्ब्ध करुन अग्निशमन कर्मचाऱ्यांचे जीवन सुरक्षित करण्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त दलास अत्याधुनिक सोयी सुविधेसह कर्मचाऱ्यांचे जीवन सुरक्षित करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे खरे आहे.
(2) या आगीवरील अग्निशमन व विमोचन कार्यात कोणतीही कमतरता निदर्शनास आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने अग्निशमन दलातील अधिकारी व जवान यांच्या वैयक्तिक सुरक्षिततेकरीता "वैयक्तिक सुरक्षिततेसाठी साधने" दिलेली आहेत.
(3) व (4) मुंबई अग्निशमन दलाने येत्या 10 वर्षात सध्या अस्तित्वात असलेल्या 33 अग्निशमन केंद्र व्यतिरिक्त २६ नवीन अग्नीशमन केंद्र प्रस्ताविलेली आहेत. तसेच नवीन साधनसामुग्री घेण्याचे प्रस्तावित आहे. नियंत्रण कक्षाच्या आधुनिकीरणाकरिता इटिग्रेटेड कमांड आणि कंट्रोल सिस्टीम बसविण्याबाबतची प्रशासकीय प्रक्रिया सुरु आहे.

-----------------

## -सोलापूर शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत अपूर्ण असलेली रस्त्यांची कामे

**(२८) * २२४१ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत सुमारे ६२ किलो मीटर रस्त्यांची कामे दिनांक १४ फेब्रुवारी,२०१४ रोजी सुरू झाली त्यापैकी ३१.२५ किलामीटरची १२ सदस्यांची कामे करारानुसार महापालिकेने मक्तेदारास रस्त्यावरील

अतिक्रमण काढून देणे, विद्युत खांब काढणे, नविन बसविणे, ड्रेनेज लाईन टाकणे इ. कामासह रस्ता बनविण्याचे काम दिले होते तथापी मक्तेदाराने सदरील कामे न करताच फक्त रस्त्याचे काम सुरू केल्याने रस्तो अर्धवट झाल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नासंबधी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशी अती कोणती कारवाई संबंधित दोषीवर करण्यात आली आहे, तसेच, आतापर्यंत मंजुरी मिळालेल्या प्रकल्पांना किती अनुदान देण्यात आलेले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**बोरगांव-शिरगांव (ता.तासगांव, जि.सांगली) या परिसरात कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत**

**(२९) * ११०५ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) बोरगांव-शिरगांव (ता.तासगांव, जि.सांगली) या परिसरातील कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने अनेक शेतक-यांच्या पिकांना पाणी मिळत नसून शेतातील पीक नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर- नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या विभागातील कमी दाबाने वीज पुरवठा होण्याची कारणे काय आहेत व परिसरातील शेतक-यांना तातडीने योग्य दाबाने वीज पुरवठा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यस विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (1) होय.

(2) बोरगांव - शिरगांव या परिसरातील शेतक-यांना 33/11 के.व्ही. बोरगांव उपकेंद्रातुन निघणा-या 11 के.व्ही. बोरगाव व 11 के.व्ही. शिरगांव या शेती वाहिन्याकरुन वीज पुरवठा करणेत येत होता. विजेच्या कमाल मागणी काळात या वाहिन्यावरील भार वाढल्याने काही शेतक-यांना कमी दाबाने वीज पुरवठा मिळत होता.

याकरिता पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(2) 11 के.व्ही. बोरगांव वाहिनीवरील काही भार "11 के.व्ही. निबळक - चिखलगोठण "ही स्वतंत्र शेती वाहिनी निर्माण करुन त्यावर जोडला आहे. सदरचे काम दि. 5 नोव्हेंबर, 2014 रोजी पुर्ण करण्यात आले.

(3) 11 के.व्ही. शिरगांव वाहिनीवरील काही भार 110 के.व्ही. तासगांव उच्चदाब उपकेंद्रातून निघणा-या "11 के.व्ही. आरवाडा शेती वाहिनीस जोडण्यात आला आहे. सदरचे काम दि. 4 नोव्हेंबर, 2014 रोजी करण्यात आले असून या उपाययोजनांमुळे बोरगांव - शिरगांव या परिसरातील शेतक-यांना योग्य दाबाने वीज पुरवठा मिळत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पारस (ता.बाळापूर जि.अकोला) येथील औष्णिक विद्युत केंद्रांच्या नविन प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(३०) * ११९४ श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पारस (ता.बाळापूर जि.अकोला) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या नविन 500 मेगावॅटच्या प्रकल्पास शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मंजूरी देऊनही ही अद्याप प्रकल्पाचे कामे सुरु करण्यास विलंबाची कारणे काय,
(3) सदर कामाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** १) नाही,
२) व ३) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**सांताक्रुझ (पश्चिम) येथील सिध्दीविनायक बिल्डर्स (विकासक) यांने बोरीवली (पश्चिम) येथे न्यू मरक्युरी सोसायटीचे बांधकामास सुरुवात केली नसल्याबाबत**

**(३१) * १३९८ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सांताक्रुझ (पश्चिम) येथील सिध्दीविनायक बिल्डर्स (विकासक) यांने बोरीवली (पश्चिम) येथे न्यू मरक्युरी सोसायटी विकासित करुन देणेसाठी सन 1997 मध्ये 22 लोकांकडून रु.1,98,00,000/- (रु. एक कोटी अठ्ठयानऊ लाख) एवढी रक्कम घेतली हे खरे आहे काय ,
(2) असल्यास, त्या विकासकाने अदयापपर्यत बांधकामास सुरुवात केलेली नाही हे खरे आहे काय,
(3) असल्यास, त्या विकासकाने 22 लोकांची केलेली दिशाभूल व फसवणूक याकरिता विकासकाला शासन काळया यादीत टाकणार आहे काय,
(4) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त माहितीनुसार संबंधित बोरिवली (पश्चिम) येथील अंतिम भूखंड क्र.478, नगर रचना-3, या भूखंडावर संबंधित विकासकाने दि.२१.३.१९९४ रोजी नियुक्त वास्तुविशारदामार्फत प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाबाबत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिनांक ३०.०७.१९९६ रोजी देण्यात आले होते.

मात्र परवानगीपेक्षा वाढीव बांधकाम केल्यामुळे अशा स्वरुपाच्या महापालिकेने निश्चित केलेले १५४ प्रकरणांमध्ये सदर प्रस्तावाचा अंतर्भाव करण्यात आला होता व सदर इमारतीचे वाढीव भाग प्रचलित धोरणानुसार नियमित केले जाईल असे घोषित करण्यात आले होते.

महानगरपालिकेच्या सदर निर्णयाविरोधात श्री.राजेंद्र ठक्कर यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.३७९ सन २००३ दाखल केली. मा.न्यायालयाने सदर जनहित याचिकेच्या सुनावणी दरम्यान मा.आयुक्तांना दिलेल्या निर्देशानुसार संबंधित विकासक, वास्तुविशारद तसेच महापालिकेचे संबंधित अधिकारी यांच्या समक्ष दि.२७.४.२००७ रोजी सुनावणी घेतली.

या सुनावणीदरम्यान दिलेल्या आदेशानुसार, सदर इमारतीचे बांधकाम नियमित करण्यासाठी आवश्यक असलेले शुल्क/क्षमापित/सूट केलेल्या सामाजिक अतंराचे

अधिमूल्य बांधकाम नियमित करण्यासाठी दंडाची रक्कम इत्यादीचा भरणा विकासकाने महापालिकेस केलेला आहे.

तथापि, मध्यंतरीच्या काळात सदनिका खरेदीदारांनी संबंधित विकासका विरुध्द नगर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे बी.सी.सी.सी.सुट क्र.५१७ सन २००८ अन्वये याचिका दाखल केलेली आहे. व सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**सावंतवाडी ( जि.सिंधुदुर्ग) येथे जलसिंचन प्रकल्पातील जलविद्युत निर्मितीसाठी सोडण्यात येणा-या अवेळी पाण्यामुळे सुमारे 22 जणांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३२) * ६३८ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) सावंतवाडी तालुक्यातील ( जि.सिंधुदुर्ग) जलसिंचन प्रकल्पातील जलविद्युत निर्मितीसाठी अवेळी सोडण्यात येणा-या पाण्यामुळे सुमारे 22 जणांचा माहे जून 2014 अखेर मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे का,

(2) असल्यास, अवेळी पाणी सोडण्यास जबाबदार असणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) तसेच अवेळी विजनिर्मितीसाठी पाणी सोडल्याने मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या नायर,केईएम,सायन आणि शासनाच्या जेजे आणि कामा रुग्णालयामध्ये नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभाग अपुरे असल्याबाबत**

**(३३) * १७६ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील महापालिकेच्या नायर,केईएम,सायन आणि शासनाच्या जेजे आणि कामा रुग्णालयामध्ये नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभाग अपुरे असल्याचे माहे सप्टेंबर,2014 च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मुंबईत दिवसाला शेकडो बालके जन्माला येतात मात्र बालकांची प्रकृती गंभीर असल्यास त्यांना अतिदक्षता विभागामध्ये जागा मिळवण्यासाठी प्रतीक्षत रहावे लागते हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, मुंबईतील महापालिकेच्या नायर,केईएम,सायन आणि शासनाच्या जेजे आणि कामा रुग्णालयामध्ये नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या वाढवून कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) मुंबई महानगरपालिकेच्या नायर, केईएम सायन रुग्णालयात नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभागात अनुक्रमे 25, 37 व 40 खाटा उपलब्ध असून सदर रुग्णालयांत जन्म झालेल्या नवजात बालकांसाठी उपरोक्त खाटांची संख्या पुरेशी आहे.
(2) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमधील नवजात बालकांना आवश्यकतेनुसार अतिदक्षता विभागता भरती करण्यात येते. तथापि, काही प्रसंगी क्षमतेपेक्षा जास्त नवजात बालक दाखल झाल्यास खाटांच्या अनुपलब्धतेबाबत प्रसंग उध्दवू शकतो.
(3) व (4) बृहन्मुंबई महानगरपलिकेच्या प्रमुख रुग्णालयांमधील नवजात बालकांच्या अतिदक्षता विभागाची क्षमता वाढविण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने के.ई.एम रुग्णालयामध्ये नवजात बालकांच्या अतिदक्षता विभागाचे काम चालू असून सदर विभागात 5 खाटा वाढविण्यात येत आहेत.
जे.जे रुग्णालयात 22 खाटांचे स्वतंत्र नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (एन.आय.सी.यु) व 15 खाटांचे नवजात अतिदक्षता विभाग (पी.आय.सी.यु) उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे जे.जे रुग्णालय येथे सुपर स्पेशालिटी (अतिविशेषोपचार) रुग्णालय उभारण्यासंदर्भात शासन मान्यता दिली आहे. सदर अतिविशेषोपचार रुग्णालयामध्ये 50 खाटांचे नवजात अर्भक दक्षता विभागाचा समावेश करण्यात आला आहे. तसेच कामा व आल्बेस रुग्णालयामध्ये 21 खाटांचे स्वतंत्र नवजात अर्भक अतिदक्षता विभाग व ७ खाटांचे नवजात अतिदक्षता विभाग उपलब्ध आहे.

-----------------

**मुंबई महापालिकेतील प्रभाग स्तरावरील ई-निविदा प्रक्रियेत सहाय्यक आणि दुय्यम अभियंत्यांनी सुमारे 100 कोटीचा भ्रष्टाचार केल्याबाबत**

**(३४) * २७९ श्री.आर.आर.पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अबंरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई महानगरपालिकेतील प्रभाग स्तरावरील ई-निविदा प्रक्रियेत सहाय्यक आणि दुय्यम अभियंत्यांनी सुमारे 100 कोटीचा गैरव्यवहार केल्याचे माहे जुलै,2014 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) प्रस्तुत प्रकरणाबाबतच्या प्राथमिक चौकशीच्या अतंरिम अहवालानुसार, ई-निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक स्वरुपाचे फरबदल करुन विशिष्ट कंत्राटदारांना मदत करण्याचा हेतू होता असे प्रथमदर्शनी केलेल्या चौकशीमध्ये आढळले या प्रक्रियेअतंर्गत अदांजे रु.९ कोटीची कंत्राटे अतंर्भूत होती कंत्राटदारांनी मूळ रकमेच्या सरासरी अदांजे ३० टक्के कमी इतक्या दराने निविदा भरलेल्या आढळल्या सदरबाबत प्राथमिक चौकशी अतिंम टप्प्यात आहे.
२) व ३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार, चाचणी लेखापरिक्षा व दक्षता अधिकारी यांनी प्राथमिक तपासणी करुन अहवाल सादर केला आहे, काही अभियंत्यांनी आपले युजरआयडी, पासवर्ड/डीजीटल सिग्नेचर एकमेकांशी शेअर केले असल्याचे प्रस्तुत चौकशीच्या अतंरीम अहवालात नमूद केले आहे, बिड

क्रिएटर व डिजीटल सिग्नेचर असलेल्या 23 अभियंत्यांची खात्यांतर्गत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, त्यापैकी ९ अभियंत्यांना चौकशीसापेक्ष महापालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील अधेंरी पुर्वेतील 'अपना घर' या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील टिडीआर परस्पर विकल्याबाबत**

**(३५) * ९६४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील, अधेंरी पुर्वेतील 'अपना घर' या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील टिडीआर परस्पर विकल्याची बाब निदर्शनास आलेली असतांना मुळ विकासकाच्या नावे बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करुन विक्री करावयाच्या इमारतीच्या नावे तीन बँकातून सुमारे 300 हून अधिक कोटी कर्ज उचलून गैरप्रकार केला असल्याची बाब माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाने या घोटाळ्याची सखोल चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(3) असल्यास, दोषीवर कोणती कठोर कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मौजे गुंदवली अधेरी (पूर्व) येथील न.भू.क्र. ३७६ ड (पै) ३७६ (पै), 412,413,415,417,419,420(पै),421,422,423 (पै), 424 (पै), 467 (पै), या भूखंडावरील अपना घर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनवर्सन योजनेतंर्गत 930 चौ.मी. एवढा टीडीआर निर्माण झाला होता. हा टीडीआर या योजनेचे विकासक मे. झुमी कन्स्ट्रक्शन कंपनी यांना वितरीत करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकराणाने दि. 24 ऑक्टोबर, 2005 रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस शिफारस केली होती.
(2), (3) व (4) अपना घर को-ऑप हौ.सोयाटीचे विकासक झुमी कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या कंपनीचे बनावट कागदपत्रे बनवून त्यांच्या इमारतीच्या पुनर्विकासाचे व्यवहारात देव डेव्हलपर्सचे श्री. नैलेश मेहता यांनी फसवणूक केल्याबाबत आर्थिक गुन्हे शाखा कक्ष-2, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे श्री जावेद गफुर पठाण यांनी केलेल्या फिर्यादीवरुन संबंधिताविरुध्द गु.र.क्र.88/2014 गुन्हा दाखल झाला आहे. आर्थिक गुन्हे शाखा कक्ष-2 यांनी हा प्रकरणी दि. 7 नोव्हेंबर, 2014 च्या पत्रान्वये या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची मूळ कागदपत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून मागितली होती. सदर कागदपत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि. 2 डिसेंबर, 2014 रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, आर्थिक गुन्हे शाखा कक्ष - 2, मुंबई या कार्यालयाकडे सोपवली आहेत.

-----------------

**नागपूर शहरात डेंग्यू रुग्णांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(३६) * १२८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा**

**खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.आर.आर.पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईसह राज्यात मलेरिया व डेंग्यूची मोठ्या प्रमाणात साथ पसरली असून अनेक नागरिकांचा मृत्यू झाला असून जनतेत चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे ,माहे आक्टोबर -नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच, शासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक त्या औषधाचा तुटवडा असल्याने व रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याने रुग्णांचे हाल होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) या साथीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (1) हे अशंत: खरे आहे. मुंबईसह राज्यात माहे ऑक्टोबर - नोव्हेंबर (दि. 19 नोव्हेंबर) डेंग्यू रोगाची लागण 1351 नागरिकांना झाली असून 14 मृत्यू झालेले आहेत. तसेच मलेरिया रोगाची लागण 20450 नागरिकांना झाली असून ४ मृत्यू झालेले आहेत. तसेच मलेरिया रोगाची लागण २०४५० नागरकिांना झाली असून मृत्यू ४ झालेली आहे.

(2) हे खरे नाही.

(3) राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप/डेग्यूं नियंत्रणात आणण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या व येत आहेत.

- आरोग्य कर्मचा-यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण
- उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण
- ताप रुग्णांचे रक्तनमूने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी.
- तपासणी अती आढळून आलेल्या हिवताप रुग्णांना जंतूच्या प्रकारानुसार समुळ उपचार
- राज्यात हिवतापाने होणारे मृत्यू टाळण्यासाठी 61 सेंटीनल सेंटर कार्यरत आहेत.
- राज्यात डेंग्यू तापाच्या निदानासाठी 26 सेंटीनल सेंटर व एनआयव्ही येथे व्यवस्था
- राज्यात गप्पी मासे पैदास केंद्र कार्यरत असून राज्यातील डासोत्पती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडणे.
- हिवताप उद्रेकग्रस्त भागात तसेच हिवतापासाठी अतिसंवेदनशील निवडक शहरी भागात अळी नाशकाची आठवडी फवारणी गावांमध्ये सिथ्रेटिक पायरेथ्राइड किटकनाशकाची घरोघरी फवारणी
- किटकशास्त्रीय सर्वेक्षणा अतंर्गत पाणी साठयांची तपासणी, डासआळया आढळून आलेले पाणी साठे रिकामे करणे, व रिकामे करता न येणा-या पाणी साठयामध्ये टेमिफॉस 50 टक्के इ.सी अळीनाशकाचा योग्य त्या प्रमाणात वापर.

- डेंग्यू उद्रेकग्रस्त गावांत किटकनाशकाची धुरफवाणी
- शासकीय आरोग्य संस्थांना आवश्यक तो औषधांचा पुरेसा पुरवठा तसेच जिल्हयांना किटकनाशके, अळीनाशके व साहित्यसामुग्रीचा पुरवठा.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा / विभागीय राज्ययस्तरिय अधिका-याच्या भेटी.
- विविध माध्यमाद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील झोपडपट्यांचा खाजगी विकासकामार्फत विकास करण्याचे काम झोपडपट्टी पुनर्विकासांतर्गत करण्याचा निर्णय**

**(३७) * १५८२ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईच्या आर्थररोड ते सातरस्ता या परिसरातील कडदोडी चाळ, पारशीवाडी चाळ, अथर्व बिल्डीग, राधाबाई पानसरे चाळ, रामचंद्र हेजिप्स चाळ बी व सी, ओमसाई सदन, मेघनगर, 144 टेनामेंट बिल्डीग, डॉ.आबडेकर सदर ए, बी, सी, म्युनिसिपल ब्लॉक सी ते व्ही, ॲब्युलन्स गॅरेज, जिल्हा कारागृह वसाहत, लालवाणी भूवन, बेस्ट पॉवर हाऊस लक्ष्मीदास वाडी, कबुतर चाळ, लकडीवाडी इस्टेट, शांतीनगर गोविंद खिमजी चाळ, तय्यब बिडीग, नळवाला चाळ, आगाखान बिल्डीग, फायर फायटर सोसायटी, आबेडकर नगर डी कमिटी, लक्ष्मीपूजा अपार्टमेंट, सिध्दीविनायक अपार्टमेंट, रामदेव नगर, शास्त्रीनगर, महाराष्ट्र नगर, भिम नगर, विजय नगर, आदर्श नगर, गणेश नगर सी/डी कमिटी, साने गुरुजी नगरी बी कमिटी, साईबाबा नगर, हे जे. आर बोरीचा मार्ग व जी.बी.सकपाळ मार्ग, येथील झोपडपट्या पुनवर्सन योजनेंतर्गत (एसआरए) गेल्या ५ वर्षापासून निष्कासित करुन त्यांच्या खाजगी विकासकामार्फत विकास करण्याचे काम झोपडपट्टी पुनर्विकासांतर्गत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुंबई मध्यवर्ती कारागृह (आर्थरोड जेल) या परिसरात 182 मीटर भोवतालच्या परिसरात बांधकाम करण्यास मनाई करण्याचा निर्णय शासनाने घेतला त्यांनतर दिनांक 4 डिसेंबर, 2013 रोजी शासनाने अधिसुचना काढून कारागृहाच्या परिसरात 500 मीटर पर्यंत कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी नाही असा निर्णय घेतल्याने त्या परिसरातील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत करावयाची पुनर्विकासाची कामे रखडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, गेल्या 5 वर्षापासून निष्कासित केलेल्या प्रश्नोक्त परिसरातील पुनर्विकासाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) मुंबईतील आर्थर रोड कारागृहाच्या परिसरातील १)श्रमिक एकता को ऑप, फेडरेशन लिमिटेड, २) आदर्श नगर एकता समता जनता, ३) गणेश नगर "ड", ४) गणेश नगर "सी" ५) इदिरा नगर, ६) साने गुरुजी "बी" कमिटी, ७) श्री.साईबाबा नगर ८) लक्ष्मी ॲव्हेन्यू, ९) नाथू भगत या ९ सहकारी गृहनिमार्ण संस्थाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण दाखल करण्यात आलेल्या आहेत.
(२) व (३) महाराष्ट्र कारागृह नियमावली १९७९ मधील प्रकरण ५ प्रिझन बिल्डीग आणि सॅनिटरी ॲरेंजमेंट मधील नियम २ नुसार कारागृहाच्या मुख्य तट भिंतीपासून १८२.८८ मीटर पर्यंतच्या परिसरात कोणतेही बांधकामास परवानगी देऊ नये अशी तरतूद आहे.

या संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाकडील फौजदारी रिट याचिका क्र.२७६१/२०११ सह ३५२८/२०११ मधील दि.२४/१०/२०१३ च्या आदेशास अनुसरुन एमआरटीपी ॲक्ट १९६६ च्या कलम १५४ च्या तरतूदीनुसा नगरविकास विभागाने दि.४/१२/२०१३ च्या आदेशान्वये राज्यातील कारागृहांच्या सभोवताली ५०० मीटर अतंरामध्ये कोणत्याही विकासकामास परवानगी देण्यापूर्वी संबंधित क्षत्रासाठी स्थायी सल्लागार समितीची नियुक्ती करुन त्यांची पूर्वसंमती घेणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार ज्या ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना करागृहाभोवतीच्या ५०० मीटर अतंराच्या आत आहेत, त्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना उपरोक्त आदेशानुसार सदरहू स्थायी सल्लागार समितीसमोर योग्य त्या निर्णयार्थ ठेवणे अपेक्षित आहे. त्यानुसार ५०० मीटर अतंराच्या आत आहेत, त्या झापडपट्टी पुनर्वसन योजना उपरोक्त आदेशानुसार सदरहू स्थायी सल्लागार समितीसमोर योग्य त्या निर्णयार्थ ठेवणे अपेक्षित आहे. त्यानुसार ५०० मीटर अतंरामधील झोपडश्रपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव सदरहू स्थायी सल्लागार समितीसमोर योग्य ते निर्णय होतील. त्याकरीता संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे विकासक व वास्तूविशादर यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून नियोजन प्राधिकरणाच्या भूमिकेतून कळविण्यात आले आहे.

-----------------

**कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सिडको वसाहतीत आरोग्य विभाग आणि हिवताप निर्मुलन विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याबाबत**

**(३८) * ८६५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सिडको वसाहतीत आरोग्य विभाग आणि हिवताप निर्मुलन विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने डासांचा प्रार्दुभाव वाढला असून सदरहू परिसरात मलेरियाची साथ पसरली असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) सिडकोच्या कळंबोली वसाहतीत डासांचा प्रादुर्भाव वाढू नये व हिवतापाची (मलेरिया) साथ पसरू नये म्हणून सिडकोच्या आरोग्य विभाागाकडून आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना वेळोवेळी करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निफाड तालुक्यातील साकोरे मिग या परिसरात द्राक्षांच्या बागांना वीज पुरवठा करण्याबाबत**

**(३९) * ९७५ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) साकोरे मिग (ता.निफाड, जि. नाशिक) या परिसरात आठवड्यातून 2 दिवस वीज पुरवठा होत असल्याने द्राक्षांच्या बागांना पाणी देणे गैरसोयीचे होत असल्याने शेतक-यांनी वीज कार्यालयावर मोर्चा काढून सहाय्यक अभियंता यांना वीज पुरवठा

आठवड्यातून चार वेळा करावा अशी मागणी करणारे निवेदन दिनांक 25 सप्टेंबर, 2014 रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, निवेदन देऊन जवळपास 2 महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी अद्याप वीज पुरवठा आठवड्यातून 4 वेळा करण्याबाबत निर्णयात्मक कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(3) सदर मागणीच्या अनुषंगाने किती कालावधीत कार्यवाही पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अशंत: खरे आहे. साकोरे मिग (ता.निफाड, जि.नाशिक) या परिसरात आठवड्यातून ३ दिवस दिवसा वीज पुरवठा केला जातो.
(२) ११ के.व्ही. साकोरे फिरडवर वीज ग्राहकांना आठवड्यातून रोटेशनप्रमाणे दिवसा चार दिवस वीज पुरवठा उपलब्ध करुन देणे सद्य:स्थितीतील उपकेंद्रातील रोहित्राच्या क्षमतेमुळे तांत्रिक दृष्टया शक्य नाही.
(३) पायाभूत आराखडा-२ मधील प्रस्तावित नवीन दोन वीज उपकेंद्रे कार्यान्वित झाल्यावर रोटेशन प्रमाणे आठवड्यातून चार दिवस ८ तास दिवस व तीन दिवस १० तास रात्री विद्यूत पुरवठा उपलब्ध करता येईल. सदर प्रस्तावित ३३/११ के.व्ही. चिंचखेड व ३३/११ के.व्ही. पाचोरे वणी (पिंपळगांव एम.आय.डी.सी.) उपकेंद्रे अनुक्रमे नोव्हेंबर २०१५ व सप्टेंबर २०१५ पर्यंत कार्यान्वित होण्याचे अपेक्षित आहे.

-----------------

**राज्यात शासकीय रुग्णालयातील रक्ताचे दर पाट्ट पारचेत वाढल्याबाबत**

**(४०) * २०३९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सदा सरवणकर (माहिम) :**
सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात शासकीय रुग्णालयातील रक्ताचे दर प्रती एककामागे 450 रुपयांवरुन 1050 रुपयांवर, तर खाजगी रक्तपेढ्यांमधील दर 850 वरुन 1450 रुपयांवर वाढविले आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सद्याच्या महागाईच्या काळात रुग्णांना रक्तांकरिताही अधिक रक्कम मोजावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, रक्ताच्या दरावर नियंत्रण ठेवण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय.
(३) व (४) राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दिनांक १२.०२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत रक्त व रक्त घटकांची प्रक्रिया/चाचणी शुल्क वाढविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यास अनुसरुन राज्यात दि.१८ जून, २०१४ व दि.२५ जून, २०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये रक्त व रक्त घटकांबाबत आकारावयाचे सेवा शुल्कात वाढ करण्यात आली आहे. दर कमी करण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

-----------------

**मुंबई उपनगरातील दहिसर-पूर्व हनुमान टेकडी दोन तरुणांना वैयक्तीक आकसातून दहिसर पोलिस स्टेशनचे पीआय यांनी बेकायदेशीर अटक करुन दोन दिवस कारागृहात ठेवल्याबाबत**

**(४१) * २४४८ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई उपनगरातील दहिसर-पूर्व हनुमान टेकडी अशोक वन येथे राहणाऱ्या श्री.ब्रिजेश गुप्ता व श्री.रमेश विश्वकर्मा या निष्पाप तरुणांना वैयक्तिक आकसातून दहिसर पोलिस स्टेशनचे पोलीस इन्सपेक्टर श्री.किशोर डोईजड यांनी दिनांक 3 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास बेकायदेशीर अटक करुन कोणताही गुन्हा नसताना दोन दिवस कारागृहात ठेवले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरचा गुन्हा न नोंदविण्याकरिता दहिसरच्या पोलीस इन्सपेक्टरने 50,000/- रुपयांची लाच मागितली व त्यातील फक्त 10,000/- रुपये दिल्याने त्यांना अटक केली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(4) असल्यास, संबंधित पोलिस स्टेशनच्या पोलीस इन्सपेक्टरवर तसेच या प्रकरणास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**आदिवासी बहूल पालघर, डहाणू, विक्रमगड तालुक्यातील धामणी येथे सूर्या नदीवर बांधण्यात आलेले धरणाचे काम अद्यापी अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४२) * १९७१ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) आदिवासी बहूल पालघर, डहाणू, विक्रमगड तालुक्यातील शेतक-यांच्या शेतजमिनी सिंचनाखाली आणण्यासाठी 1972 साली डहाणू तालुक्यातील धामणी येथे सूर्या नदीवर धरण बांधण्यात आले असून, राज्य शासन व जलसंपदा विभागाच्या गलथान कारभारामुळे तब्बल 35 वर्षानंतरही प्रकल्पाचे काम अद्यापी अपूर्णावस्थेत असून, प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापी संबंधित शेतक-यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(2) सदरहू सूर्या प्रकल्प व या प्रकल्पाच्या कालव्यासाठी पालघर तालुक्यातील एकूण किती शेतक-यांच्या किती `क्षत्राच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत,

(3) सदरहू संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्यास 35 वर्षापेक्षा अधिक कालावधी होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(4) सदरहू संपादित केलेल्या शेतक-यांच्या जमिनीच्या मोबदला संबंधितांना विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अशंत: खरे आहे.

सूर्या प्रकल्पातील जलाशयाचे काम पूर्ण असून १४६९६ हे. प्रकल्पिक सिंचन क्षमता १२४९० हे. सिंचना क्षमता निर्माण झाली आहे.

सूर्या प्रकल्पासाठी आवश्यक एकूण १९४४.०० हे. `क्षत्रापैकी १६६८.०७ हेक्टर भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाला आहे. भूसंपादनासाठी रु.३५७.१७ लक्ष जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून अदा करण्यात आले असून, उर्वरित रु.१३४.४७ लक्ष अदा करावयाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) सुर्या प्रकल्पासाठी एकूण सुमारे ९०७१ शेतकऱ्यांची जमिन आवश्यक असून, त्यापैकी पालघर तालुक्यातील सुमारे ५१०० शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी आवश्यक आहेत. शेतकऱ्यांचे १००.७२७ हे.`क्षत्र संपादित केलेले आहे व उर्वरित १८४.३८७ हे.`क्षत्र संपादनाची कार्यवाही सुरु आहे.
(३) जमीनीचे अभिलेख अदयावत नसणे, ७/१२ व संयुक्त मोजणी प्रत न जुळणे, तसेच निधी अभावी कलम ४ घोषित न करणे, यास्तव भूसंपादन प्रकरणी विलंब होत आहे.
(४) कालव्यासाठी आवश्यक भूसंपादनासाठी कामाच्या आवश्यकते नुसार कार्यवाही चालू आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महानगरपालिका`क्षत्रात लागु केलेला एल.बी.टी व ऑक्ट्रॉय रद्द करणेबाबत**

**(४३) * ८९३ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) महाराष्ट्रातील 26 पैकी 25 महापालिका`क्षत्रात एल.बी.टी. लागु करण्यात आला असून एल.बी.टी.व ऑक्ट्रॉयला व्यापाऱ्यांचा तीव्र विरोध असल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, एल.बी.टी व ऑक्ट्रॉय रद्द करण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी फेडरेशन ऑफ महाराष्ट्र (फाम) यांच्यावतीने शासनाकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1), (2), (3) व (4) स्थानिक संस्था कर रद्द करण्याबात विविध संघटनाकडून शासनास निवेदने प्राप्त झाली असून सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**चारकोप-वांद्रे-मानखुर्द मार्गाच्या 31.87 किलोमीटर अतंराच्या या 12 हजार कोटी खर्चाच्या मेट्रो-2 प्रकल्पाचे नो कॉस्ट ॲण्ड नो क्लेम्स या तत्वावर करार रद्द करण्यात आल्याबाबत**

**(४४) * १२०२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) चारकोप-वांद्रे-मानखुर्द मार्गाच्या 31.87 किलोमीटर अतंराच्या या 12 हजार कोटी खर्चाच्या मेट्रो-2 प्रकल्पाचे नो कॉस्ट ॲण्ड नो क्लेम्स या तत्वावर हा करार रद्द केला

असल्याचे माहे नोव्हेंबर 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर करार हा रद्द होण्यामागील सर्व साधारण कारणे काय आहेत,
(3) तसेच मुंबई शहराच्या विकासासाठी व वाहतुकीला चालना देण्यासाठी हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय
(२) मुंबई मेट्रो लाईन-2 प्रकल्पाकरिता चारकोप व मानखुर्द येथील कारडेपोकरिता पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकारने किनारा नियमन (CRZ) `क्षत्रासंबंधातील परवानगी देताना घातलेल्या काही जटील अटी, उन्नत मार्गाकरिता काही स्थानक रहिवाश्यांनी दर्शविलेल्या विरोध इत्यादी करणामुळे सदर प्रकल्पाच्या सवलत करारनामा दोन्ही पक्षाच्या सहमतीने संपुष्टात आणण्यात आला आहे.
(३) दरम्यान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मे.राईटस् या सल्लागारामार्फत "चारकोप-वांद्रे-मानखुर्द" या ऐवजी "दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द" ह्या ४० कि.मी. लांबीच्या पूर्णत: भुयारी मेट्रो रेल्वे मार्गाचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यात आला असून त्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २०.११.२०१४ रोजी मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### रोहा तालुक्यातील नागोठणे येथील रिलायन्स कंपनीत काम करणा-या माथाडी कामगारांना न्याय मिळणेबाबत

**(४५) * ७६९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) रोहा तालुक्यातील नागोठणे येथील रिलायन्स कंपनीत गेल्या 20 वर्षापासून काम करत असलेल्या माथाडी कामगारांनी वेतन वाढ व अन्य सोयीसुविधा मिळण्यासाठी कंपनी विरुध्द कृती केल्याने दिनांक 21 ऑगस्ट, 2014 पासून कंपनी व्यवस्थापनाने या कामगारांना कंपनीत प्रवेश बंदी केली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या घटनेमुळे या भागातील प्रकल्पग्रस्त, भूमीपुत्र व स्थानिक असलेल्या सुमारे 178 माथाडी कामगारांवर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने याबाबत कोणती भूमिका घेतली आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) नागोठाणे येथील रिलायन्स कंपनीतील कार्यरत असलेल्या मंडळाच्या नोंदित कामगारांची मजूरी वाढ व इतर सोयीसुविधांबाबत उभयपक्षात तोडगा काढण्यासाठी किराणा बाजार व दुकाने मंडळाच्या योजनेच्या खंड 33 अन्वये सुनावणी सुरु असताना कामगांरानी पुकारलेल्या संपाच्या परिणामी मे. रिलायन्स इडंस्ट्रिजच्या व्यवस्थापनाने व 2 ठेकेदारांनी कामगारांना दि. 21.08.201 पासून प्रवेशबंदी केल्याची तक्रार कामगारांनी दि. 22.08.2014 रोजीच्या पत्रान्वये केली होती, हे खरे आहे.
(2) हे खरे नाही, कारण मे, रिलायन्स या कंपनीत कार्यरत असलेल्या व प्रवेशबंदी केलेल्या 154 नोंदित कामगारांपैकी दीर्घकालीन रजेवर असलेले 4 कामगार वगळता दि. 30.08.2014 रोजी 100 कामगार, तर त्यानंतर वेळोवेळी बैठका होऊन 46 कामगार रुजू करुन घेण्याबाबत किराणा बाजार व दुकाने मंडळाकडून प्रयत्न सुरु आहेत.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हडपसर (जि.पुणे) येथील सोलापूर रस्त्यावरील सोनगिरा सराफाच्या दुकानातील 40 लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लुटल्याबाबत**

**(४६) * ११६० श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) हडपसर (जि.पुणे) येथील सोलापूर रस्त्यावरील रविदर्शन सोसायटीतील सोनगिरा सराफाच्या दुकानातील सुमारे 1500 ग्रॅम वजनाचे, 40 लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लुटल्याची घटना माहे नोव्हेंबर, 2014 च्या पहिल्या आठवड्यात घडली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, दिवसाढवळ्या अशा प्रकारच्या चोरीच्या घटना वारंवार होत असल्यामुळे सराफ व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त चोरीचा तपास लागला आहे काय तसेच चो-यांवर आळा घालण्याकरीता शासनाने काही ठोस उपाययोजना केली आहे काय,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**नाशिक विमानतळावरील अत्याधुनिक टर्मिनलचे काम पुर्ण होवूनही विमान उड्डानांना अद्यापही सुरवात झाली नसल्याबाबत**

**(४७) * १०२० श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नाशिक विमानतळावरील अत्याधुनिक टर्मिनलचे काम पुर्ण होवून पाच महिन्यानंतरही केवळ राज्य शासन व एच.ए.एल यांच्यातील इमारत हस्तांतरीत वादामुळे विमान उड्डानांना अद्यापही सुरुवात झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, टर्मिनल हस्तांतरण करुन येथे नागरी विमानसेवा सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :**

(१) अशंत: खरे आहे.
(२) व (३) विमानतळ प्रवासी इमारत हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडला हस्तांतरित करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. ओझर विमानतळा वरुन नियमित हवाई सेवा सुरु करण्याबाबत हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेड प्रयत्नशील आहे.

-----------------

**मुंबई येथील खटाव मिलचा विकास प्रकल्प राबविताना पर्यावरण विभागाच्या मजुरीविना अवैध मजले वाढविण्यात आल्याबाबत**

**(४८) * १०० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबई येथील खटाव मिलचा विकास प्रकल्प राबविताना पर्यावरण विभागाच्या मजुरीविना अवैध मजले वाढविण्यात येवून महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) असे निदर्शनास आलेली नाही.
(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धामणगांव लघु संग्राहक सिंचन प्रकल्पास**
**(ता.दारव्हा, जि.यवतमाळ) मंजुरी मिळण्याबाबत**

**(४९) * ३५२** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) धामणगांव लघुसंग्राहक सिंचन प्रकल्प (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) या प्रकल्पाला मंजुरी मिळण्यासाठी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांचेकडून दिनांक 13 जुलै, 2011 रोजी शासन स्तरावर अनुपालन अहवाल सादर केला असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून प्रकल्पाला मंजुरी देण्यासंदर्भात जलसंपदा मंत्री यांना दिनांक 12 सप्टेंबर, 2011 रोजी वा त्यानंतर वारंवार निवेदनाद्वारे विनंती केली , हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील प्रस्तावाची शासन स्तरावर तपासणी होवून माहे ऑगस्ट, 2014 वा त्यादरम्यानच्या सुमारास जलसंपदा विभागाकडून नियोजन विभागास प्रस्ताव पाठविण्यात आला, हे खरे आहे काय,
(3)असल्यास, धामणगांव व लगतच्या परिसरातील बारमाही पाणी दुर्भिक्ष्य लक्षात घेता व शेतीना सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने उक्त प्रस्ताव मान्य करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(4) नसल्यास, विलंबाची कारणे का आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** १. नाही.
२. होय.
३. सदर योजनेस महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्रधिकरणाने शेल्फवर ठेवण्याची मान्यता दिली आहे, त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केलेला आहे.
४. प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील रायगड किल्ल्याची वीज बिलाची रक्कम**
**न भरल्याने वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याबाबत**

**(५०) * २ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) रायगड जिल्ह्यातील रायगड किल्ल्याची केवळ 31 हजारांच्या वीज बिलाची रक्कम न भरल्याने वीज वितरण विभागातर्फे रायगड किल्ल्याचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला असल्याचे माहे 29 ऑक्टोबर,2014 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील वीज पुरवठा खंडित राहू नये म्हणून सामाजिक कार्यकर्ते विष्णू गवळी यांनी वीज बिल भरले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, भारतीय पुरातत्व खात्याच्या कामात हस्तेक्षप केल्याप्रकरणी गवळी यांच्यावर पुरातत्व खाते कारवाई करणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रायगड किल्ल्याची वीज खंडीत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) रायगड किल्लासाठी मंजूर असलेल्या पाच वीज जोडण्यांपैकी एका जोडणीचे वीज बील डिसेंबर २०१२ पासून अदा केले नसल्याने या जोडणीचा वीज पुरवठा तात्पुरता खंडीत करण्यात आला होता.
(२) वीज बीलाचा भरणा ऑनलाईन पध्दतीने केलेला असल्याने भरणा करणाऱ्या व्यक्तीबाबत महावितरण अनभिज्ञ आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहीद जवानांच्या विधवांसाठी म्हाडामधील घरे देण्यातील**
**425 घर घोटाळा व माळेत 'पोस्ट कार्ड' घोटाळा**

**(५१) * १४४० श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यातील शहीद जवानांच्या विधवांसाठी म्हाडामधील घरे देण्यात येणाऱ्या सुमारे 425 घरांच्या गैरव्यवहाराच्या माध्यमातून 'पोस्ट कार्ड' गैरव्यवहार निदर्शनास येऊन त्यामध्ये अकंम नावाच्या दलालाचा सहभाग असल्याची माहिती म्हाडाच्या दक्षता विभागाला प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त दलालाने म्हाडाच्या प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांना पोस्ट कार्ड पाठवून तुमचा अर्ज यशस्वी करुन नंबर लावून देतो अशी खास दिवाळी ऑफर देवून गैरव्यवहार केल्याबाबतची लेखी तक्रार श्री.शंकर किसन अडे या अर्जदाराने दिनांक 9 ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्या सुमारास म्हाडाच्या दक्षता अधिका-यांकडे या दलालाची चौकशी करावी अशीही मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने म्हाडाच्या दक्षता विभागातील अधिका-याने आतापर्यंत काय चौकशी केली आहे काय चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषीवर पुढे काणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे,

अर्जदार श्री.शंकर किसन अडे यांना त्यांच्या तक्रारीबाबत निवेदन देण्यासाठी मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा प्राधिकरण यांनी दि.२८.१०.२०१४ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित राहण्याकरिता कळविले होते. तथापि, ते उपस्थित न राहिल्याने त्यांना दि.२६.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये पत्र मिळाल्यापासून ३ दिवसात कार्यालयात कार्यालयीन वेळेत चौकशीकरिता उपस्थित राहून सहकार्य करावे अन्यथा त्यांचे काही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन त्यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येईल, असे मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी, म्हाडा प्राणिकरण यांनी तक्रारदार श्री.शंकर किसन अडे यांना कळविले आहे. तसेच या प्रकरणी दलालाचे कोणतेही गैरवर्तन दिसून आल्यास कडक फौजदारी कारवाईच्या शिफारशीची तजवीज करण्यात आली असून पुढील चौकशी सुरु आहे. प्रसंगत: तक्रारदार श्री.शंकर किसन अडे हे संकेत क्र.२७१, प्रतिक्षा नगर, सायन पी.एच. प्रवर्गात सन २०११ च्या सोडतीमध्ये प्रतिक्षा यादीवरील अर्जदार होते. त्या सोडतीमधील चारही यशस्वी अर्जदारांनी सदनिकांचा ताबा घेतला असल्यामुळे प्रतिक्षा यादीवरील अर्जदारांबाबत वितरण प्रक्रियेचा प्रश्न उद्भवत नाही.

यापूर्वी शहिद जवानांच्या विधवा पत्नीना म्हाडाकडून वितरित झालेल्या सदनिकांच्या फसवणूक प्रकरणी फेरचौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्याचे म्हाडाच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांनी खेरवाडी पोलिस स्टेशनला कळविल्यावर त्याअनुषंगाने खेरवाडी पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र.क्र.१२१/२०१४ कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ भा.द.वि. अन्वये दि.१२.२.२०१२ रोजी गुन्हा दाखल केलेला असून त्याचा पुढील तपास खेरवाडी पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

-----------------

### वांद्र (पूर्व) या मतदार संघात वांद्रे (पूर्व) रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी बांधलेल्या पादचारी पुलाच्या दोन्ही बाजुला असलेल्या गरीबनगरमध्ये 1 ते 3 मजल्याच्या अनधिकृत झोपड्या उभारल्याबाबत

**(५२) * १७७९ श्री.प्रकाश (बाळा) सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) वांद्रे (पूर्व) येथून वांद्रे रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी बांधलेल्या पादचारी पुलाच्या दोन्ही बाजुला असलेल्या गरीबनगरमध्ये 1 ते 3 मजल्याच्या अनधिकृत झोपड्या उभारल्याने होणाऱ्या दुर्गंधीमुळे पादचारी पुलावरुन जाणाऱ्या प्रवाश्यांना गुदमरल्यासारखे व असुरक्षिततेचे होते तसेच पुलावर फेरीवाल्यांची वर्दळ व प्रवाश्यांची होणारी लुटमार यासंदर्भात स्थानिक आमदारांनी अनधिकृत बांधलेल्या झोपड्यांचे व फेरीवाल्यांचे निष्कासन करण्यासाठी दिनांक 13 नोव्हेंबर, 2014 रोजी मा.मुख्यमंत्री व तत्पूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री यांना लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(2)असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(3)अद्याप निवेदनातील मागणीची दखल घेण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत वा त्यासाठी पर्यायी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे खरे आहे.

(2) व (3) सदरची जागा ही रेल्वे प्राधिकरणाच्या मालकीची असून त्यावरील कारवाई करणे ही रेल्वे प्राधिकरणाची जबाबदारी आहे. तथाप, उचित कार्यवाही करण्याची विनंती रेल्वे प्राधिकरणाला करण्यात येईल.

-----------------

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती केंद्राच्या उरण**
**(जि.रायगड) येथील प्लांटमध्ये आग लागल्याबाबत**

**(५३) * ७११ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती केंद्राच्या उरण (जि.रायगड) येथील प्लांटमध्ये माहे ऑक्टोबर, 2014 च्या सुमारास आग लागल्यामुळे या आगीमध्ये सुमारे दीड ते दोन कोटीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या आधीही या प्लांटमध्ये आग लागण्याअगोदर फायर ऑडीट करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय ,
(3) असल्यास, या फायर ऑडिटमध्ये असलेल्या त्रूटीची पूर्तता करण्यात आली होती काय,
(४) नसल्यास , उक्त आगीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** १) महानिर्मिती कंपनीच्या उरण येथील वायुवर आधारित वीज निर्मिती केंद्राशी संलग्न असलेल्या महापारेषण कंपनीच्या उरण उपकेंद्रातील ५० एम.व्ही.ए. क्षमतेच्या रोहित्र क्र.२ ला दिनांक २३.१०.२०१४ रोजी आग लागली होती, हे खरे आहे.
२) होय,
३) होय,
४) तांत्रिक बाबीमुळे आग लागली असल्याने कारवाईचा प्रश्न उद् भवत नाही.
५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मालाड पश्चिम येथील म्हाडाच्या योजनेतील सदनिका**
**नावावर करुन देण्याचे आमिष दाखवून केलेली फसवणुक.**

**(५४) * १३५९ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील मालाड पश्चिम येथील म्हाडाच्या योजनेतील सदनिका नावावर करून देऊ असे आमिष दाखवून आणि त्याबाबतची खोटी कागदपत्रे देऊन काही नागरिकांची फसवणुक केल्याप्रकरणी मालवणी पोलीस ठाण्यात 28 जणांविरुध्द माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(2) सदरहू सदनिकेचा माहे डिसेंबर 2012 पर्यंत ताबा मिळेल असे सदरहू नागरिकांना सांगण्यात आले असून आजमितीस ताबा न मिळाल्यामुळे मालवणी पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतरही याप्रकरणी कोणतीही कारवाई झालेली नसल्यामुळे फसवणूक झालेल्या नागरिकांनी दिनांक 11 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्या दरम्यान मुंबईतील आझाद मैदानात धरणे आदोंलन केले, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असलेल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?
(5) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**मनमाड (जि. नाशिक) येथील पोलीसांच्या वसाहतीची अतिशय दयनिय अवस्था झाली असल्याबाबत**

**(५५) * २२७ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
1) मनमाड (जि. नाशिक) येथील पोलीस वसाहतीची अतिशय दयनीय अवस्था झाली असल्याचे दिनांक 4 ऑक्टोंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
2) असल्यास,सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून निधी मंजूर झाला असूनही सार्वजनिक बांधकाम विभाग दुरुस्त करीत नसल्याने तेथील रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1), (2), (3) व (4) मनमाड (जि.नाशिक) येथील पोलीस वसाहतीची खराब अवस्था झाल्याचे निदर्शनास आल्याने सदर वसाहतीची दुरुस्ती करण्यासाठी रु.10.17 लाख इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरीत करण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निवासस्थानांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाइत राज्यभरातून भेसळयुक्त माल जप्त केल्याबाबत**

**(५६) * १५३६ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) अन्न व औषध प्रशासनाने दिवाळीत केलेल्या कारवाइत राज्यभरातून दीड कोटीहून अधिक किंमतीचा भेसळयुक्त माल जप्त केला, हे खरे आहे काय,
(2) असलेल्यास, भेसळीच्या मालाचे 1575 नमुने दोनच प्रयोगशाळा असलेल्याने त्यांच्या तपासणीचे अहवाल प्राप्त न झाल्याने संबंधितांवर अद्याप कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,
(3) असलेल्यास, उक्त बाब 1 व 2 नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(4) असलेल्यास, तपासणी अहवाल विहित वेळेवर मिळण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा केली आहे,
(5) नसलेल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशंत: खरे आहे.

(२) नाही.
(३) होय.
(४) प्रशासनातील मुंबई येथील प्रयोगशाळेत वरिष्ट तांत्रिक सहायक ०८ रिक्त पदे बाहययंत्रणेमार्फत (कंत्राटी पध्दतीने) नियुक्त करुन युध्दपातळीवर दिवाळी सणाच्या अनुषंगे घेतलेल्या नमुन्यांचे विश्लेषण तातडीने करुन घेण्यात आले.

तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अधिपत्याखालील विविध जिल्हयातील ११ प्रयोगशाळेमार्फत तपासून घेण्याचा सर्व सह आयुक्त यांना निर्देश देवुन पाठपुरावा करुन विश्लेषण त्वरेने करण्याची कार्यवाही क्षत्रीय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदा ( जि.अहमदनगर) तालुक्यातील विसापूर प्रकल्पाच्या तलावात कुकडी प्रकल्पाचे पाणी न सोडल्याने ऊसाचे पीकाचे झालेले नुकसान

**(५७) * ४८५ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
1) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर प्रकल्पाच्या तलावात कुकडी प्रकल्पाचे पाणी न सोडल्याने विसापुर तलाव लाभक्षेत्रातील हजारो हेक्टर जमीनीवरील पिके, कोटयवधी रुपये किमतीचा ऊस माहे जाने, 2013 च्या पहिल्या आठवडयात जळून गेला, हे खरे आहे काय,
2) असल्यास विसापुर तलावाचा कुकडी प्रकल्पात समावेश करण्यात येईल व विसापुरसाठी 1 टीएमसी पाणी राखीव ठेवू असे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 19 जानेवारी,2013 रोजी श्रीगोंदा येथील शिष्टमंडळास दिले, हे ही खरे आहे काय,
3) असल्यास श्रीगोंदा तालुक्यातील विसापूर तलावाचा कुकडी प्रकल्पात समावेश करणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीष महाजन :** १. हे खरे नाही.

कुकडी प्रकल्प व विसापूर प्रकल्प हे दोन स्वतंत्र प्रकल्प आहेत व कुकडी प्रकल्पातून विसापुर प्रकल्पात पाणी शेतीसाठी सोडण्याची तरतूद नाही. त्यामुळे विसापुर तलावात कुकडी प्रकल्पाचे पाणी शेतीसाठी सोडण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
२. हे खरे नाही.

कार्यालयीन अभिलेखानुसार तत्कालीन मुख्यमंत्री महोदय दि.१९ जानेवारी २०१३ रोजी राजस्थान दौ-यावर होते.
३. कुकडी प्रकल्पांतर्गत पाणी नियोजन पूर्ण झाले असल्यामुळे आता नव्याने विसापुर तलावाचा समावेश कुकडी प्रकल्पात कारणे उचित होणार नाही.
४. प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा. हद्दीत येणा-या गुंठेवारी मुदत 2001 असल्यामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(५८) * १३७६ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा. हद्दीत येणा-या गुंठेवारी पध्दतीची मुदत 2001 असल्यामुळे नियमितीकरणापासून वंचित असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक 01 ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास,सदरील मुदत 2010 पर्यंत करण्याची नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदरील मुदत वाढविण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1), (2) होय, यासंदर्भात स्थानिक लोक प्रतिनिधी काडून त्यांचे दि. 10 नोव्हेंबर, 2014 च्या निवेदनांन्वये शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहेत.
(3), (4) सदर निवेदनाचे अनुषंगाने नागपूर शहरातील गुंठेवारी विकासाबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे नागपूर सुधार प्रन्यासला कळविण्यात आले आहे. त्यावरील अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

**नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ऐतिहासिक गांधीसागर तलावामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत**

**(५९) * १०१२ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नागपूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ऐतिहासिक गांधीसागर तलावाच्या मधोमध छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबतचे निवेदन जा. क्र. 548/2014 अन्वये मा. मुख्यमंत्री यांना दिनांक 2 जून, 2014 रोजी व त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, माहे मार्च, 2014 च्या अधिवेशनात स्थानिक लोकप्रतिनीधी मध्य नागपूर यांनी गांधीसागर तलावाच्या मधोमध छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळा उभारण्यासंदर्भात कपात सुचना (क्र. ए 4 मुख्य लेख शिर्षक 2051 सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्र. 2 मान्य करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर पुतळा उभारण्यासाठी शासनाकडे आवश्यक प्रस्ताव तयार करण्यासंदर्भात मा.आयुक्त नागपूर महानगरपालिका नागपूर यांना माहे मे, 2014 च्या तीस-या आठवडयात निवेदन सादर केले होते, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(5) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्याअनुषंगाने ऐतिहासिक गांधीसागर तलावाच्या मधोमध छत्रपती शिवाजी महाराजा पुतळा उभारण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** १. होय
२. नाही.
३. होय.
४. नाही.

सदर बाबी संदर्भात सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रं. स्मारक-3113/ प्र.क्र.308/29, दिनांक २१ सप्टेंबर, २०१३ मधील अनु क्रं.२ नुसार नगर विकास विभागाने निर्णय घ्यावयाचा आहे. या अनुषंगाने सदर निवेदन नगर विकास विभागाकडे पाठविण्यात आले आहे.
५. प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**जवखेड ( ता.पाथर्डी, जि. अहमदनगर ) येथील**
**जाधव कुटुंबाची क्रूर हत्या करण्यात आल्याबाबत.**

**(६०) * १३९ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.आर.आर.पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

1) जवखेड ( ता.पाथर्डी, जि. अहमदनगर ) येथील जाधव कुटुंबातील तीन जणांची दिनांक २१ ऑक्टोबर, 2014 रोजी वा त्यादरम्यान क्रूर हत्या करण्यात आली आहे , हे खरे आहे काय,
2) असल्यास, जाधव कुटुंबाची हत्या होऊन एवढया कालावधीनंतरही आरोपीचा अद्यापपर्यंत शोध घेण्यात पोलिसांना अपयश आले आहे, हे ही खरे काय,
3) याबाबत विविध सामाजिक, धार्मिक, राजकिय संघटनांच्या प्रतिनिधीनी या घटनेचा निषेध करुन राज्यपालांना निवेदने देखील दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
4) असल्यास,सदर जिल्हयात वारंवार होणाऱ्या दलित हत्याकांडातील आरोपीवर कोणतीच कारवाई होत नसल्याने पोलिस यंत्रणेवर येथील जनतेत संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
5) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आरोपीना अटक करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
6) अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर गुन्हयातील फिर्यादी (मयत यांचा पुतण्या) याचा गुन्हयातील सहभाग निश्चित असल्याबाबतचा पुरावा उपलब्ध झाला असून, त्यानुसार दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजी सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने सदर आरोपीस दिनांक १३ डिसेंबर, २०१४ पर्यंतची पोलीस कोठडी रिमांड मंजूर केला आहे. गुन्हयातील अनुषंगीक सखोल चौकशी सुरु आहे.
(३) होय.
(४) नाही. दलितांवरील अत्याचारासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रत्येक तक्रारीची अत्यंत गांभीर्याने दखल घेऊन वेळोवेळी योग्य त्या कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच दाखल झालेल्या गुन्हयांचे सखोल व बारकाईने तपास करण्यात येऊन तपासाअती आरोपी विरुध्द मा.न्यायालयात वेळोवेळी दोषारोप पत्र दाखल

करण्यात आलेले आहेत. अहमदनगर जिल्ह्यात दलितांवरील अत्याचार थांबविण्याकरीता अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अतंर्गत जाणिव जागृती व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. तसेच वेळोवेळी कार्यशाळा/बैठका घेऊन गुन्ह्यांना प्रतिबंध केला जातो.
(५) सदर गुन्ह्यातील फिर्यादी (मयत यांचा पुतण्या) याचा गुन्ह्यातील सहभाग निश्चित असल्याबाबतचा पुरावा उपलब्ध झाला असून, त्यानूसार दिनांक ३ डिसेंबर, २०१४ रोजी सदर आरोपीस अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने सदर आरोपीस दिनांक १३ डिसेंबर, २०१४ पर्यंतची पोलीस कोठडी रिमांड मंजूर केला आहे. गुन्ह्यातील अनुषंगीक सखोल चौकशी सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जोगेश्वरी (मुंबई) येथील नभु क्र.166/167 मौजे मजास या भूखंडावर मेसर्स कल्पतरु कंस्ट्रक्शन कंपनी यांनी रीलोकेट केलेला दवाखाना, शाळा, अर्थवट रस्ता इ.सुविधा प्रशासनाकडे हस्तांतरीत न केल्याबाबत**

**(६१) * ५५६** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) जोगेश्वरी (मुंबई) येथील नभु क्र.166/167 मौजे मजास या भूखंडावर मेसर्स कल्पतरु कंस्ट्रक्शन कंपनी यांनी नविन बहुमजली इमारतीचा प्रस्ताव सन 2002 च्या दरम्यान राबविला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, नभु क्र.166/167 मौजे मजास या भूखंडावरील महानगरपालिकेच्या विकास व नियोजन आराखड्यात सार्वजनिक उदिष्टांकरीता रस्ते, दवाखाना, शाळा व उद्यान या आरक्षित सुविधा आहेत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर विकासकाने या आरक्षित सुविधांपैकी आतापर्यंत किती सुविधा सार्वजनिक उदिष्टांकरीता हस्तांतरीत केल्या आहेत,
(4) असल्यास, सन 2004 मध्ये सदर भूखंडाच्या (नभू क्र. 166) च्या मालकीबाबत हरकत निर्माण होऊन सदर भूखंडाची मालकी न्यायप्रविष्ठ असताना या भूखंडावर बहुमजली इमारतीचे बांधकाम करुन 2006 साली त्यांना ताबापत्र देण्यात आले, हे खरे आहे काय,
(5) असल्यास, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना देखील या इमारतीना ताबापत्र कोणत्या नियमाखाली देण्यात आले आहे,
(6) असल्यास, महानगरपालिकेच्या विकास नियोजन आराखड्यात व विकासकाने या भूखंडावर इमारत बांधण्याचा सादर केलेल्या नकाशात इमारत क्र.3 जवळ सार्वजनिक उदिष्टांकरीता आरक्षित असलेल्या सुविधांपैकी दवाखाना ही सुविधा अधोरेखित असताना सद्या या इमारत क्र.3 जवळ दवाखाना अस्तित्वात नाही त्या मागील कारणे काय आहेत,
(7) आरक्षित सुविधांपैकी रीलोकेट केलेला दवाखाना, शाळा, अर्थवट रस्ता इ.सुविधा प्रशासनाकडे हस्तांतरीत न करण्यामागची कारणे काय आहे व त्या सुविधा प्रत्यक्ष केव्हा उपलब्ध होतील,
(8) असल्यास, शासनाची दिशाभूल करुन या इमारतीना ताबापत्र देण्यास भाग पडणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात शासन कोणती कारवाई करणार आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**पनवेल (जि. रायगड) येथील प्रस्तावित विमानतळाबाबत**

**(६२) * १६९९ श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पनवेल (जि. रायगड) येथील प्रस्तावित विमानतळाकरीता संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या प्रकल्पग्रस्त मालकांना गाव सोडण्यास आणि शेती देण्यास सिडकोने राजी करुन फक्त 52 प्रकल्पग्रस्तांना भुखंड देऊन शेकडो खातेदारांना कुठलाही लाभ दिला नसल्याचे माहे ऑक्टोबर, 2014 मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने उक्त प्रकल्पग्रस्तांना त्यांची झालेली नुकसान भरपाई देऊन त्यांचे त्वरीत पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नवी मुंबई आतरंराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी तसेच नवी मुंबई प्रकल्पासाठी भविष्यात संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीच्या भूधारकांसाठी भूसंपादनापोटी देय मोबदल्याबाबत आणि त्यानुषंगिक पुनर्वसन विषयक लाभासंदर्भातील धोरणास शासन निर्णय दि.१.३.२०१४ व दि.२८.५.२०१४ अन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर धोरण मान्य असणाऱ्या बाधीत भूधारकांना त्यानुसार सिडकोकडून लाभ प्रदान करण्यात येतील. तसेच, सदर धोरण मान्य नसेल किंवा इतर कारणास्तव सदर धोरणाचा लाभ देणे शक्य नसेल अशा बाधित भूधारकांना नवीन केंद्रिय भूमी संपादन अधिनियमानुसार मोबदला अदा करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या धोरणानुसार लाभ स्विकारण्यास दि.२६.८.२०१४ पर्यंत एकूण ४९ बाधीत भूधारकांनी / बांधकाम धारकांनी संमती दिली असून त्यांना देय मोबदल्यापोटी पारदर्शक सोडतीद्वारे भूखंड मंजूर करण्यात आले आहेत दि.२३.९.२०१४ ते दि.२६.११.२०१४ या कालावधीतील सुमारे १९०० बाधित भूधारकांनी / बांधकाम धारकांनी सदर धोरणाचे लाभ स्विकारण्यास स्वेच्छेने संमती दिलेली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील ब्लड सेपरेशन युनिट बंद अवस्थेत असल्याबाबत

**(६३) * १४०१ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील ब्लड सेपरेशन युनिट 'खरेदी करुन 2 वर्षे होऊनही अजुनही हे युनिट बंद अवस्थेत असल्याने शासनाचे करोडो रुपये वाया गेले असल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त युनिट बंद राहण्याची कारणे काय आहेत,

(4) असल्यास, सदर युनिट तात्काळ सुरु करणबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) या रुग्णालयातील रक्तघटक विलगीकरण केंद्र दि.२४ मे, २०१४ पासून सुरु झालेले आहे. दि.१४ सप्टेंबर, २०१४ रोजी सेंट्रीफयुज मशिनमध्ये शॉर्ट सर्कीट झाल्याने मशिन अचानक बंद पडले. सदर मशिनच्या अधिकृत पुरवठाधारकास कळविण्यात आले व त्यांनी तपासणीअती Over Voltage Protection Board मध्ये बिघाड झाल्याचा अहवाल दिला व पार्ट बदलणे आवश्यक असल्याचे सांगितले. सदर मशीन जर्मन बनावटीची असल्याने परदेशातून पार्ट मागविण्यात आला. सदर पार्ट दि.२६.११.२०१४ रोजी प्राप्त झाला असून तो बसविण्यात आला व दिनांक १.१२.२०१४ पासून मशीन पूर्ववत सुरु झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई अग्निशमन दलाकडे इमारती व टॉवरचे फायर ऑडिट करण्यासाठी यंत्रणा नसल्याबाबत**

**(६४) * १७९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईकरांच्या सुरक्षतेच्या दृष्टिने मुंबईतील इमारतीचे फायर ऑडिट करणे बंधनकारक आहे मात्र वाढत्या इमारती व टॉवरचे फायर ऑडिट करण्यासाठी मुंबई अग्निशमन दलाकडे यंत्रणाच नसल्याचा धक्कादायक प्रकार माहे ऑगस्ट,2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार इमारती व टॉवरचे फायर ऑडिट करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबत मुंबई अग्निशमन दलाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६ मधील कलम ३(३) व नियम ४(२) या तरतुदीन्वये संबंधित इमारतीचे मालक, समिती किंवा व्यवस्थापन यांनी शासनाने नियुक्त केलेल्या एजन्सीद्वारे तपासणी करुन आपल्या इमारतीचा / आस्थापनाचा तसा अहवाल अग्निशमन दलाला प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलै महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे.

सध्या मुंबई अग्निशमन दलातर्फे इमारतीची तपासणी करण्यासाठी फायर ॲक्ट सेल अशी यंत्रणा आहे. या यंत्रणेअतंर्गत ८० अधिकारी कार्यरत आहेत.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक अधिनियम २००६ मधील कलम ३(३) व नियम ४(२) अतंर्गत बृहन्मुंबईतील इमारती / आस्थापने यांची अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीच्या कक्षा रुंदावल्या असल्यामुळे इमारतीच्या तपासणी संबंधीच्या तरतुदीची अमंलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर कक्षासाठी एकूण ९९ अधिकारी नामनिर्देशित करण्यात येणार आहेत. त्यानुसार सदर अधिकारी तपासणी करुन त्रुटी आढळल्यास विहित मुदतीत पूर्तता करण्याबाबत सूचना देतील व सदर सूचनांची अंमलबजावणी झाल्याची खात्री करतील.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**घाटंजी (जि. यवतमाळ) तालुक्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पासाठीच्या जमीन खरेदीतील गैरव्यवहार**

**(६५) * १३१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
1) घाटंजी (जि. यवतमाळ) तालुक्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पासाठी खरेदी करण्यात आलेल्या जमीन व्यवहारात 7 कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक 8 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
2) तसेच निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या बुडीत `क्षत्रातील जमिनीचे `क्षत्रफळ वाढविणे, कोरडवाहू असलेल्या शेतीना बागायती दाखविणे, जमिनीत सागवान, आब्यांची झाडे दाखविणे, फळबाग नसताना फळबागा असल्याचे दाखविणे इत्यादी गैरप्रकार करण्यात आले असल्याचे दिनांक 7 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
3)असल्यास, उपरोक्त गैरव्यवहार प्रकरणी संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
3) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) नाही.
तथापी, जिल्हाधिकारी नांदेड यांचे दि. 16 जानेवारी, 2012 चे पत्रान्वये महामंडळास सादर केलेल्या अहवालानुसार सरळ खरेदीमधील जमीनीच्या व्यवहारात सदर रक्कम अतिप्रदान झाल्याचे नमूद केले आहे.
(2) नाही.
तथापी, वरील अहवालामध्ये संगणीकृत 7/12 चे उतारामध्ये अशा प्रकारची तफावत दर्शविण्यात आली आहे.
(3) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी श्री. र.प्र.लांडेकर, अधिक्षक अभियंता, बुलडाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलडाणा व श्री.कि.रा.हातगांवकर, स.मु.अ.जसं.वि, अमरावती यांची या प्रकरणी चौकशी करिता नेमणूक करुन चौकशी अर्ती दि. 11 नोव्हेंबर, 2013 चे पत्रानुसार सादर केलेला मुद्दनिहाय चौकशी अहवाल महामंडळास सादर केला. हा अहवाल महामंडळाचे दि. 14 नोव्हेंबर, 2013 नुसार शासनास सादर करण्यात आला. या मध्ये सरळ खरेदी करताना महसूल खात्यामार्फत पुरविलेल्या 7/12 चे उतारा प्रमाणे कार्यवाही झालेली असल्याने जलसंपदा विभागाचे अधिकारी अतिप्रदानास जबाबदार नाही. जमीनीच्या 7/12 चे उतारातील तफावतीबाबत कार्यवाही करणेची बाब जिल्हाधिकारी नांदेड यांनी याप्रकरणी संबंधित तलाठी व मंडळ निरिक्षक यांना निलंबित केलेले आहे. या प्रकरणासंबंधात दाखल करण्यात आलेली याचिका मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.
(4) पश्र उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील 55 हजाराहून अधिक गुंतवणूकदारांची पर्ल्स इडीया या कंपनीने करोडो रुपयांची केलेली फसवणूक

**(६६) * ९८२ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) सांगली जिल्ह्यातील गुंतवणुकदारांना भुरळ टाकून पर्ल्स इडीया या कंपनीचे सन 2001 पासून सुरु असलेले सांगली माधवनगर रस्त्यावरील कार्यालय बंद केल्याने सांगली जिल्ह्यातील 55 हजाराहून अधिक पैसे गुंतविण्या-या गुंतवणूकदारांची करोडो

रुपयांची फसवणूक झाल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी पोलिसांनी चौकशी केली आहे काय,
(3) असलयास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**नाशिक शहर धान्य वितरण कार्यालयाकडून वितरीत करण्यात येणा-या शिधापत्रिका वाटपातील गैरप्रकार**

**(६७) * ९०२ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नाशिक शहर धान्य वितरण कार्यालयाकडून वितरीत करण्यात येणा-या शिधापत्रिका वाटपातील गैरप्रकार माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास धान्य वितरण कर्मचारी, सेतु कर्मचारी व एजंट यांची साखळी तयार होऊन सामान्य नागरीकांची पिळवणूक होत आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, शासनाने या गैरप्रकाराची चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
5) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही.
(3), (4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील क्षय रोग व कुष्ठरोग या आजारावर उपययोजना करण्याबाबत**

**(६८) * १२०४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1)मुंबईत गत 6 वर्षात टीबीमुळे 46,606 जणांचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,
(2) तसेच कुष्ठरोग नियंत्रण मोहिमेत मुंबईतील ए वार्ड (पिवळा बंगला), के-पश्चिम (आनंदनगर, भंडारवाडी) एम पूर्व (बैंगणवाडी), पी-उत्तर (कुरार), एल (बैलबाजार) या भागांमध्ये कुष्ठरोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून आले हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही. तथापि मुंबई शहरामध्ये गेल्या ६ वर्षात सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत नोंद झालेल्या व एकूण मृत्यू पावलेल्या रुग्णांची संख्या ६२४८ इतकी आहे.

(२) ए वार्ड,के-पश्चिम (आनंदनगर, भंडारवाडी) एम-पूर्व (बैंगणवाडी), पी-उत्तर (कुरार), एल (बैल बाजार) जी/नॉर्थ (पिवळा बंगला) या एकूण सहा वॉर्डामध्ये सन २०१२-१३ मध्ये ३७० नवीन कुष्ठरुग्ण शोधले होते. सन २०१३-१४ मध्ये ३२३ रुग्ण शोधले होते. तसेच या वर्षात ऑक्टोबर २०१४ अखेर १३९ कुष्ठरुग्ण आढळून आले आहेत.

तसेच आनंदनगर, भंडारवाडी, बैंगणवाडी, कुरार, बैल बाजार, पिवळ बंगला या भागात सन २०१३-१४ मध्ये ७२ नवीन कुष्ठरोग आढळले होते व या वर्षात ऑक्टोबर २०१४ अखेर ३० रुग्ण आढळून आले आहेत.

(३) मुंबईत क्षयरोगामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी मुंबई जिल्ह्याचे एकूण २४ झोनमध्ये विभाजन करण्यात आले असून सर्व २४ झोनमध्ये सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविणे सुरु आहे.

मुंबई शहरामध्ये कुष्ठरुग्णांचे प्रमाण कमी होण्यासाठी कुष्ठरुग्णांचे लवकर निदान येतो. त्यासाठी आरोग्य शिक्षण, जनजागृती कार्यक्रम व विशेष कुष्ठरोग शोध मोहिमचे आयोजन इ.उपक्रमाद्वारे समाजात लपून राहिलेले जास्तीत जास्त नवीन कुष्ठरुग्ण शोधून सर्व शासकीय निमशासकीय आरोग्य संस्थांमधून मोफत बहुविध औषधोपचार दिला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) येथील ओ.एन.जी.सी. कंपनीत कंत्राटी कामगार असलेल्या सुरक्षारक्षकांना वेतन देण्यात आले नसल्याबाबत**

**(६९) * ७७० श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :**

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) पनवेल (जि.रायगड) येथील ओ.एन.जी.सी.कंपनीत कंत्राटी कामगार असलेल्या सुरक्षारक्षकांना माहे जानेवारी, 2014 पासून वेतन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, वेतन अदा न करण्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, गेली 20 वर्षे कंपनीत प्रामाणिकपणे काम करणा-या सुरक्षारक्षकांनी वेतन मिळण्यासाठी दिनांक 15 ऑगस्ट, 2014 या स्वातंत्र्यदिनी उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सुरक्षारक्षकांच्या उपोषणानंतर कंपनीने वेतन देण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (1) ओ.एन.जी.सी. कॉलनीमध्ये मे. सी आय एस बी फॅसिलिटी सर्व्हिस प्रा.लि. या खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सीमार्फत कार्यरत असलेलया 20 सुरक्षा रक्षकांची माहे जानेवारी, 2014 पासून अन्वये बदली केल्याने निर्माण झालेल्या विवादामुळे त्यांना वेतन मिळाले नाही हे खरे आहे.

(2) ओ.एन.जी.सी. या आस्थापनेत मे. सी आय एस बी फसिलिटी सर्व्हिस प्रा.लि. या खाजगी एजन्सीमार्फत कार्यरत असलेल्या 120 सुरक्षा रक्षकांपैकी 23 सुरक्षा रक्षकांची कंपनीने माहे जानेवारी, 2014 मध्ये त्यांच्या उरण व सीबीडी बेलापूर या ठिकाणी बदली केली आहे. तथापि, या 23 सुरक्षा रक्षकांपैकी 20 सुरक्षा रक्षक बदलीच्या ठिकाणी हजर न होता ओ.एन.जी.सी कॉलनी येथे बसून राहत असल्योन त्यांच्या वेतनाबाबत विवाद निर्माण झाला आहे.

(3) शहर पोलीस ठाणे, पनवेल यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार कंत्राटी सुरक्षा रक्षकांनी दि. 20.08.2014 ते 7.10.2014 या कालावधीत साखळी उपोषण केल्याचे,

तसेच दि. 8.10.2014 ते 10.10.2014 याकालावधीत 6 सुरक्षा रक्षकांनी आमरण उपोषण केले असल्याचे दिसून आले आहे.
(4) ओ.एन.जी.सी. या आस्थापनेसाठी केंद्र शासन समुचित शासन असल्याने सदरच्या विवादाबाबत प्रकरण प्रादेशिक कामगार आयुक्त (केंद्रीय), मुंबई यांचेकडे समेट कार्यवाही सुरु आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मांजरपाडा वळण योजनेच्या (जि. नाशिक) प्रकल्पाचे काम बंद असल्याबाबत**

**(७०) * १०२२ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मांजरपाडा वळण बंधारा योजनेच्या (जि. नाशिक) कामाला सन 2014 - 15 करिता 70 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध असून केवळ निधी खर्चास शासनाची परवानगी नसल्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून सदर प्रकल्पाचे काम बंद पडल्याचे माहे नोव्हेंबर, 2014 मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. 5 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (1) होय.
(2) होय.
(3)व (4) उर्ध्व गोदावरी प्रकल्पाचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

**अतंरगाव प्रकल्प ( ता.दारव्हा, जि.यवतमाळ)**
**धरणाजवळील शेतजमिनीत धरणाचे पाणी राहिल्याबाबत**

**(७१) * ३५५ :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) अतंरगाव प्रकल्प (ता.दारव्हा जि.यवतमाळ) धरणाजवळील शेतजमिनी गेल्या तीन वर्षापासून पाण्याखाली असल्याने शेतजमीन आणि शेतपिकांची प्रचंड नुकसानी होवून शेतजमिन नापिक झाल्याने सदर जमीनी शासनाने संपादित करुन शेतक-यांना गेल्या तीन वर्षाची नुकसान भरपाई देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता यवतमाळ मध्यम प्रकल्प विभाग यांना दिनांक 27 ऑगस्ट, 2013 आणि कार्यकारी संचालक विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांना दिनांक 14 ऑगस्ट, 2013 रोजी निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(2) तहसिलदार दारव्हा जि.यवतमाळ यांनी सन 2010 मध्ये अतंरगाव प्रकल्पालगतच्या शेतजमिनीची मोकापहाणी करुन शेत पिकांची नुकसानी झाल्याचा अहवाल देखील दिलेला आहे हे खरे आहे काय,

(3) अतंरगाव प्रकल्पाचा निर्मितीचा प्रस्ताव तयार करताना तांत्रिक चुका राहिल्याने धरणालगतच्या शेतजमिनीवर पाणी साचून राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(4) याप्रकरणी शेतक-यांची झालेली नुकसान भरपाई देण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** १. होय.
२. नाही.
३. नाही.
४. अतंरगांव प्रकल्प हा लघु प्रकल्प असुन प्रकल्पाच्या बुडीत क्षत्राकरीता पुर्ण संचय पातळी पर्यंतच भुसंपादन केले आहे. परंतु निवेदनात नमुद कास्तकारांची जमीन ही प्रकल्पाच्या बुडीत क्षत्राबाहेर असल्याने संपादीत करुन घेण्यात आली नाही.
तथापी शासन निर्णय क्र. आश्वासन २०१२/आय.बी./(३०/१२)/मो.प्र.-२ दि.21/९/२०१२ अनुसार दिलेले निर्देशांन्वये सदर प्रकरणी पुरक भुसंपादनाची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.
५. प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

## नगर-कल्याण रोडवरील नेप्ती व निमगाव वाघ शिवारात एस.टी. बसने ५ व्यक्तीना धडक दिल्याबाबत.

**(७२) * १३६० श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नगर-कल्याण रोडवरील नेप्ती व निमगाव वाघ शिवारात एस.टी. बसने दिनांक 23 नोव्हेंबर, 2014 रोजी दुचाकीस्वारांना पाठीमागून जोराची धडक दिल्याने ४ जण जखमी व 1 जण जागीच मृत्युमुखी पडला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्याय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?
(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. दिवाकर रावते :** (1), (2) व (3) हे अशंत: खरे आहे.
दि.13.11.2014 रोजी जखणगाव जि.अहमदनगर येथे मोटारसायकल अपघातामध्ये 1 व्यक्ती मृत झाल्याचे आढळल्यामुळे नागरिकांनी रास्ता रोको करुन आदोंलन केले होते. आदोंलन कर्त्याच्या म्हणण्यानुसार दिनांक 12.11.2014 रोजी पारनेर आगाराच्या नगर-पारनेर बसने 20.45 वाजता अपघात केला असल्याने पोलीसांनी बसचालकावर गुन्हा दाखल केला असून गुन्हा तपासणीधिन आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंचणी (ता. शिरुर, जि. पुणे) येथील घोड धरणाच्या डाव्या कालव्याची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(७३) * ४८९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

1) पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील चिंचणी येथील घोड धरणाच्या डाव्या कालव्याची वितरिका, उपवितरिका, मुख्य कालवा इ. कामे अपूर्ण असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील हजारो हेक्टर`क्षेत्र सिंचनापासून वंचित आहे, हे खरे आहे काय ,
2) असल्यास, घोड डाव्या कालव्याचा अपूर्ण कामांसाठी सन 2013-14 मध्ये 23 कोटी रुपये जमा झाले होते, हे खरे आहे काय,
3) असल्यास, घोड डाव्या कालव्याच्या दुरुस्तीच्या कामासाठीचा मंजुर असलेला निधी पूर्णपणे खर्च करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
4) असल्यास, याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** १) हे खरे नाही.
२) व ३) हे खरे नाही.
घोड प्रकल्प हा महाराष्ट्र जलेक्षत्र सुधार प्रकल्पांतर्गत दुरुस्तीकरीता घेण्यात आला होता. सदर प्रकल्पाच्या कालवा व वितरीका यांच्या दुरुस्तीकरीता रु.२३.४० कोटी रक्कमेची निविदा सन २००७-०८ मध्ये मंजूर करण्यात आली होती. मंजूर निविदेतील कामापैकी ठेकेदार कंपनीने काही काम पूर्ण केले. तथापि, त्यानंतर त्यांच्या कामाची प्रगती निविदा शर्तीनुसार नसल्यामुळे दि.२९/०१/२०११ रोजी सदर काम ठेकेदाराकडून काढून घेण्यात आले आहे. त्यानंतर ठेकेदार न्यायालयात गेल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्याने उर्वरित काम करता आले नाही. त्यामुळे सन २०१३-१४ मध्ये सदर कामासाठी महाराष्ट्र जलेक्षत्र सुधार प्रकल्पांतर्गत निधी मिळाला नव्हता.
४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा. हद्दीत येणारे भुखंड कंपोस्ट डेपो, बफर झोन या विविध आरक्षणामुळे नियमितीकरण्यापासून वंचित असल्याने आरक्षण वगळण्याबाबत

**(७४) * १३७७ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) नागपूर सुधार प्रन्यास व म.न.पा. हद्दीत येणारे भुखंड कंपोस्ट डेपो, बफर झोन या विविध आरक्षणामुळे नियमितीकरण्यापासून वंचित असल्याने हजारो नागरिकांना होणारा त्रास दुर करण्याकरिता आरक्षण वगळण्याबाबत मा.मुख्य मंत्र्यांकडे मागील 2 वर्षा पासून प्रलंबित प्रस्तावावर स्थापित समितीने अद्याप पर्यंत निर्णय घेतला नसल्याचे दिनांक 1 नोव्हेंबर, 2014 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रलंबित प्रस्तावावर त्वरीत निर्णय घेण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: केंव्हापर्यंत उक्त प्रस्तावावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) शासनाने दिनांक १४.८.२०१३ च्या पत्रान्वये नागपूर शहरातील विविध आरक्षणांतर्गत जमिनीवरील अनधिकृत अभिन्यासातील गुंठेवारी विकास नियमित करण्यासंदर्भात संबंधित नियोजन प्राधिकरणास सल्ला देण्यासाठी सह संचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली सल्लागार समिती गठीत करण्याचे निर्देशित केलेले आहे. त्यानुसार सदर समितीने उक्त कंपोस्ट डेपो, बफर झोन या सह विविध आरक्षणावरील गुंठेवारी विकासासंदर्भात संबंधित नियोजन प्राधिकरणास सल्ला देणे आवश्यक असून सदर प्रकरणी सल्लागार समितीच्या

मार्गदर्शनानुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाचे त्यांच्या स्तरावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. सदर समितीच्या कामाचा वेग वाढविण्यास समितीच्या अध्यक्षांना कळविण्यात आले आहे.

-----------------

**मध्य नागपूरातील बांगलादेश वस्तीमध्ये असलेल्या लेंडी तलाव, नाईक तलावामध्ये वारंवार पानकांद्याची पैदास होणे तसेच सभोवतालची भिंती नसल्याने तेथील आसपासच्या झोपडपट्टयांमध्ये पाणी शिरत असल्याबाबत**

**(७५) * १०१४ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मध्य नागपूरातील बांगलादेश वस्तीमध्ये असलेल्या लेंडी तलाव, नाईक तलावामध्ये वारंवार पानकांद्याची पैदास होणे तसेच सभोवताली भिंती नसल्याने आसपासच्या झोपडपट्टयांमध्ये पाणी शिरणे यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त तलावाचे सौंदर्यीकरण आणि परिसरातील प्रभावीत 75 कुटुंबियांना नारा येथील घरकुल योजने अंतर्गत घरे बनवून देण्याकरिता 5 कोटी रुपयांचा निधी तसेच जे.एन.यू.आर.एम. निधी मंजूर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, घरकुल योजने अंतर्गत घर बांधण्याचे काम निधी उपलब्ध न झाल्यामुळे अर्धवट होवून बंद पडले आहे, तसेच दोन्ही तलावांचे सौंदर्यीकरणाचे काम अद्याप सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास चौकशीत काय आढळून आले आहे व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** १) मध्य नागपूरातील बांगलादेश वस्तीमध्ये असलेल्या लेंडी तलाव, येथील पानकांद्याच्या उत्पत्तीवर नियंत्रण व देखरेख ठेवण्याकरिता व पुढेही समस्या उद्भवणार नाही या दृष्टीने महानगरपालिकेद्वारे निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती २ वर्षाच्या कालावधीकरीता केलेली असून कंत्राटदारामार्फत तलावातील संपुर्ण पानकांदा काढून त्याची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे.

२) व ३) लेंडी व नाईक तलावांचे पर्यावरण दृष्टया संवर्धन करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेचा प्रस्ताव अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांच्या अध्येक्षतेखाली दि.३०.०७.२०१४ रोजी आयोजित सूकाणू समितीच्या बैठकीत पर्यावरण विभागाकडून सादर करण्यात आला होता. मात्र महानगरपालिकेने सादर केलेल्या सुधारीत प्रकल्प अहवालामध्ये या दोन्ही तलावांच्या चोहीबाजूंनी अनधिकृत वसाहती असल्याचा उल्लेख आहे याबाबत प्रदुषणाचा मुख्य स्त्रोत असलेल्या या वस्त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत प्रस्ताव विचारार्थ न घेण्याचे समितीने ठरविले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानातंर्गत शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे या उपअभियानातर्गत शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे या उपअभियानातंर्गत केंद्र शासनाद्वारे नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जात-तरोडी येथे रु.१२.४२ कोटी रकमेचे २७९ घरकुलाचा प्रकल्पा मंजूर करण्यात आला आहे, परंतू जागेच्या अनुपलब्धतेमुळे फक्त ४५ घरकुले मंजूर प्रकल्पाच्या जागेवर बांधल्यानंतर उर्वरित २३४ घरकुले नारा-नारी येथील जागेवर स्थलांतरीत करण्याचा नागपूर महानगरपालिकेद्वारा निर्णय घेण्यात आला आहे. स्थलांतरीत २३४ घरकुलाचे बांधकाम नारा-नारी येथे प्रगती पथावर आहे. स्थलांतरीत जागेवर जात-तरोडी येथील लाभार्थी इच्छुक नसल्याने नाईक तलाव सौदर्यीकरणामुळे बांधीत होणा-या ७१ लाभार्थींना नारा-नारी येथील बाधण्यात

येणा-या २३४ घरकुलामध्ये समोवश करण्याचा नागपूर महापालिकेद्वारे निर्ण्यय घेण्यात आला आहे, स्थलांतरण व इतर बाबीचा समावेश असणा-या सुधारीत प्रकल्पास राज्य व केंद्र शासनाची मंजूरी घेणे संदर्भात नागपूर महानगरपालिकेकडून कार्यवाही अपेक्षित आहे.

जात-तरोडी व नारा-नारी येथील एकूण २०७ घरकुलांकरिता यापूर्वी २.२९ कोटी उपलब्ध करण्यात आले असून व्दीतीय हप्त्यापोटी केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा म्हणून रु.५.०५ कोटी इतका निधी म्हाडामार्फत नागपूर महानगरपालिकेला उपलब्ध करण्याकरिता शासन निर्णय दि.१३.११.२०१४ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.

४) व ५) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

**हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयातील व्हेंटीलेटर**
**मशीन तंत्रज्ञ नसल्याने विनावापर पडून असल्याबाबत**

**(७६) * १४२ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयातील 5 वर्षापूर्वी खरेदी करण्यात आलेली व्हेंटीलेटर मशीन तंत्रज्ञ नसल्याने विनावापर पडून असून ती मशीन भंगारात काढण्याची वेळ प्रशासनावर आल्याचे माहे ऑक्टोंबर, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालयात व्हेंटीलेटर मशीन कार्यान्वीत करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

व्हेंटीलेटर मशीनचा वापर करण्यासाठी तंत्रज्ञ या पदाची आवश्यकता नसते. जिल्हा सामान्य रुग्णालय, हिंगोली येथे सन २००५ ते २००९ या कालावधीमध्ये एकुण ०६ व्हेंटीलेटरचा पुरवठा करण्यात आलेला होता, त्यापैकी १ व्हेंटीलेटर सद्य:स्थितीत वापरात असून ५ व्हेंटीलेटर नादुरुस्त आहेत. तसेच सन २०१३ मध्ये ३ व्हेंटीलेटरचा पुरवठा करण्यात आलेला आहे व तीनही चालू स्थितीत असून रुग्णांसाठी वापरात आहेत. नादुरुस्त व्हेंटीलेटरच्या दुरुस्तीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महानगरपालिका व शासकीय हॉस्पिटलमध्ये**
**रुग्णांना देण्यात येणाऱ्या औषधांच्या दर्जाबाबत**

**(७७) * १८० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगरपालिकेच्या भाभा हॉस्पिटलमध्ये इजेक्शनमुळे एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना घाटकोपरच्या राजावाडी हॉस्पिटलमध्ये इजेक्शनमुळे

दहा महिला पेशंटना त्रास झाल्याचे  माहे ऑगस्ट, 2014 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर दोन्ही घटनामुळे महानगरपालिका व शासकीय हॉस्पिटलमध्ये पेशंटला देण्यात येणाऱ्या औषधांच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, प्रश्न भाग 1 व 2 बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणात दोषीवर कोणती कारवाई केली तसेच महानगरपालिका व शासकीय हॉस्पिटलमध्ये पेशंटला देण्यात येणाऱ्या औषधांचा दर्जा सुधारण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(5)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**सन २०११-१२ मध्ये जलसंपदा विभागाच्या भरती प्रकीयेमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(७८) * ९०३  श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :**  सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) जलसंपदा विभागाच्या वतीने सन 2011-2012 व 2013 मध्ये अधिक्षक अभियंता परिमंडळ, नाशिक व लाभेक्षत्रविकास प्राधिकरण, नाशिक इत्यादीच्या आस्थापनेवर वर्ग 3 व वर्ग 4 पदांसाठी झालेल्या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेबर, 2014 मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या भरती प्रक्रियेत प्रवर्गाची नियमावली डावलून महिलांच्या जागी पुरुषांची नियुक्ती करण्यात आली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर भरती प्रक्रियेत खेळाडू उमेदवाराऐवजी अन्य उमेदवारांना नियुक्ती मिळाली, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, सदर भरती प्रक्रियेतील प्रवर्ग नियमावली व गैरव्यवहाराबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(5) असल्यास, संबंधित दोषीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
तथापि, नाशिक परिमंडळांतर्गत सन २०११-१२ व २०१३ मध्ये झालेल्या सरळसेवा भरती प्रक्रियेबाबत नाशिक परिमंडळ कार्यालयाला सप्टेंबर २०१४ मध्ये तक्रार प्राप्त झाली होती.
(२) व (३) नाही.
सरळसेवा भरती प्रक्रियेत शासन प्रचलित नियमानुसार सामाजिक व समांतर आरक्षणाची अमंलबजावणी करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे कु-हाड (बु.ता.दारव्हा जि.यवतमाळ) येथील गाव तलावाचे केलेल्या कामातील खाजगी जमिनी संपादित करुन मोबदला वाटप करण्याबाबत**

**(७९) * ३५६ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-
(1) मौजे कु-हाड (बु.ता.दारव्हा जि.यवतमाळ) येथे शेतक-यांच्या शेतजमिनीचे दानपत्र घेता रोजगार हमी योजने अतंर्गत सन 1984 मध्ये पूर्ण झालेल्या गांव तलावाच्या कामासाठी वापरात घेतलेल्या जागा संपादित करुन जागेचा मोबदला प्रदान करण्याकरीता कार्यकारी अभियंता सिंचन विभाग, जिल्हा परिषद यवतमाळ यांचेकडून दिनांक 18 डिसेंबर, 2013 रोजी जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे प्रस्ताव सादर केला, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाकडून ताब्यात घेतलेल्या शेतजमिनी संपादित करुन चालु बाजार भावाने मोबदला प्रदान करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे आणि त्याचे स्वरुप काय आहे व किती कालावधीत जागेचा मोबदला वाटप करणे अपेक्षित आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४), सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाचा दि. १२.०५.१९९५ चा निर्णय व त्या अनुषंगाने महसूल व वन विभागाचा दि. २६.१०.२०१० चा शासन निर्णय विचारात घेता २० वर्षाच्या विलंबाने मोबदला देय ठरत नाही. त्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.